म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. नं. 2220

# निर्माल्यसंग्रह.

## भाग १ ला.

REFBK-0001565
REFBK-0001565

साधुदास.

श्रीरामसमर्थ.

## साधुदास कविविरचित

# निर्माल्यसंग्रह

अर्थनिर्णायक टीपांसह.

काव्य ३८८

१५६५

REFBK-0001565

REFBK-0001565

पुणें येथ

'आर्यभूषण' छापखान्यांत अनंत विनायक पटवर्धन यांनीं छापिलें व सांगली येथें गोपाळ गोविंद मुजुमदार यांनीं प्रसिद्ध केलें.

सन १९१८ इ.

किंमत ८ आणे.

# प्रस्तावना.

मनाच्या दुर्बलतेमुळें कोणताच नित्यनेम सिद्धीस जाईना, तेव्हां उपास्यदेवतेला रोज एक श्लोक तयार करून वाहिल्याशिवाय अन्न-ग्रहण करावयाचें नाहीं असा नियम करून पाहिला तो श्रीराम-कृपेनें सिद्धीसही जातो असा अनुभव आला. या अनुभवाचें आतां-पर्यंतचें दृश्य स्वरूप म्हणजेच हीं तिन्ही स्तोत्रें होत. या स्तोत्रांच्या निर्माल्यांतच आणखी प्रसंगोपात्त केलेलीं दहा बारा फुलें घुसडून दिलीं आहेत. सुगंधाकरितां नाहीं तरी परमेश्वराचें उच्छिष्ट म्हणून रसिकांनीं हा निर्माल्य गोड मानून घ्यावा एवढीच विनंति आहे.

सांगली.
ता. २०।९।१८.

साधुदास.

बाड ५०८
१०।११।२८
१५६५

॥ श्री ॥

साधुदासविरचित

# श्रीमद्भीमशतीस्तोत्र.

जयांच्या नखीं दैत्य-रक्त-व्रणांच्या ।
प्रभा शोभती लाल ताज्या खुणांच्या ।
महोग्रांहि[1] आनंददा देवराया ।
नमो मारुते! त्या तुझ्या दिव्य पायां ॥ १ ॥

प्रभूंच्यां[2] निळया साजिऱ्या पावलाला ।
घडीही कधीं सोडिता जो न झाला ।
नमस्कार-भक्तीस जो कां जिव्हाळा ।
तया मंद मी वंदितों वायुबाळा ॥ २ ॥

मती खुंटते, इंद्रियें मूढ होती ।
पदें थोपती, अक्षरें भ्रांति घेती ।
गुरुत्वा तुझ्या स्वल्प ना वर्णवेचि ।
निवांतीं तुला वंदिजे योग्य हेंचि ॥ ३ ॥

न मी भक्तिचा मार्ग चोखाळिलां[3] जी ।
न वा युक्तिशीं ओळखी फार माझी ।
खुळ्या वंदनीं हांव जी या मुलाची ।
नव्हे फूल तें पाकळी घ्या फुलाची ॥ ४ ॥

महासिंधुला गांवढा एक नाला ।
मिळावा जसा तेंवि मी त्वत्पदाला ।
मनोवृत्तिंना सर्व घेऊनि माझ्या ।
प्रणामच्छलें[4] भेटतों वीरराजा! ॥ ५ ॥

---

१ मोठा उग्र असूनही आनंद देणारा. २ श्रीरामाच्या. ३ अनुसरला. ४ नमस्काराच्या निमित्तानें.

समर्थांचिया वर्णना केंवि लागूं ।
दयाळापुढें मागणें काय मागूं ।
व्यथेची कथा माझिया काय सांगूं ।
दिसेना मला कोणता एक थांगू[1] ॥ ६ ॥

तवांगांतुनी यौवन-श्री विराजे ।
शरीरावरी बाळसें रम्य साजे ।
स्मिताच्या छटा आननीं मंदचारी[2] ।
तुझें यापरी गोजिरें रूप भारी ॥ ७ ॥

नखें तांबडीं, रोमराजी[3] पिशंगी[4], ।
कटीं हेमकौपीन[5] तें दिव्यरंगी ।
किरीटप्रभा पांढरी खेळणारी ।
तुझें यापरी गोजिरें रूप भारी ॥ ८ ॥

गदेभोंवतीं बांधिली वज्रमुष्टि ।
बलांच्या[6] कला रेखिल्या गात्रयष्टि ।
तरी लोचनीं नांदतें शांति-वारी[7] ।
तुझें यापरी गोजिरें रूप भारी ॥ ९ ॥

जयांची प्रभा लोल आंदोलनांनीं[8] ।
अशीं डोलती कुंडलें गोल कानीं ।
किरीटातळीं सांवळी केशहारी ।
तुझें यापरी गोजिरें रूप भारी ॥ १० ॥

नभांच्या[9] घड्या पातल्या व्यक्त रंगा ।
नें[10] वा वायुच्या जन्मले कोंभ अंगा ।
हळूवार वेल्हाळ आनंदकारी ।
तुझें यापरी गोजिरें रूप भारी ॥ ११ ॥

---

१ ठावठिकाणा. २ हळूहळू पसरणाऱ्या. ३ केंसांची पंक्ति. ४ पिंगट. ५ सोन्याचा लंगोटा. ६ तुझे अवयव जणूं काय सामर्थ्यांचे वेगवेगळे तुकडे आहेत. ७ शांततेचें पाणी. ८ हलण्यामुळें. ९ आकाशाच्या घड्या स्पष्ट दिसूं लागल्या. १० किंवा वायूच्या अंगाला कोंब फुटले.

गुणांच्या निधाना अहो भीमराया ।
तुम्हां वर्णितां येइना पामरा या ।
मला ज्यापरी दाखवां मार्ग आतां ।
पुढें अर्पितों त्यापरी शब्दजातां[1] ॥ १२ ॥

जशा ऐकिल्या तैंवि वर्णीन लीला ।
यथाशक्ति वानीन मी माउलीला ।
उरे कामना दर्शनीं नित्य ताजी ।
कधीं बालका पाउलें दाखवां जी! ॥ १३ ॥

असे धीट मी, वाहतों हांव मोठी ।
नसे योग्यता सत्य ही सर्व गोठी ।
तरी मागणें नित्य मागेन हेंचि ।
समर्थापुढें भीड आई भिकेची ॥ १४ ॥

यशोहानिची दानदेत्यासि भीति[2] ।
अनाथें कृपा भाकणें हीच रीती ।
अदानें मुकां कीर्तिला, याद ठेवा ।
नसे घालवाया मला नांव देवा ॥ १५ ॥

मदीयापराधांस पोटांत घाला ।
नको हेंचि मी फारसें सांगण्याला ।
कसेंही म्हणा माझिया बुद्धिवादा ।
तुम्ही सेवकांचे तरी थोर दादा ॥ १६ ॥

कृपा याचिणें काम हें पामरांचें ।
समर्थांस तों दान भूषाच साचें ।
धरा दीन हातांत वा दूर सारा ।
नसे आपणांवीण या अन्य थारा ॥ १७ ॥

कुणी कीर्तियोगें चिरंजीव झाला ।
तनूनें कुणी वांचतो दीर्घ काला ।

---

१ शब्दांचा समुदाय. २ दान देणाराला (दान न दिल्यास) लौकिक जाण्याची भीति असते.

तुम्ही कीर्तिनें देहयोगें जगा या ।
चिरायू खरे जाहलां उद्धराया ॥ १८ ॥

जयाची प्रभुध्यान ही सत्ववृत्ति ।
जडोद्धारकामीं स्वभावप्रवृत्ति ।
जयाच्या सख्या दर्शनीं मोक्षलाहो ।
असा कोणता देव बोला दुजा हो ॥ १९ ॥

करोनी अकार्यें वदोनी अवाच्यें ।
प्रभो जोडिले राशि मी पातकांचे ।
परीपाक चित्तांत आणूनि भ्यालों ।
पदीं आपुल्या धांव घेऊनि आलों ॥ २० ॥

तुम्ही बुद्धिदाते तसे ज्ञानदाते ।
तुम्ही सर्व कल्याण माझे पहाते ।
तुम्ही बोधदाते तसे मोक्षदाते ।
तुम्हावांचुनी कोण तारील मातें ॥ २१ ॥

उडी मारुनी लंघिला वारिराशि ।
करीं घेउनी आणिलें पर्वतासी ।
जडोद्धारही एक तैसीच लीला ।
तरी दीन हा दास कां मोकलीला ॥ २२ ॥

कृपा याचितों पात्र मी तों न तीला ।
नका जी हंसूं माझिया या कृतीला ।
अपात्राप्रती देइजे दानमाला ।
असे न्याय हा, पात्र याची कशाला ? ॥ २३ ॥

प्रभू तो असे भक्त-लौकैक-बंधु ।
विरक्तां बुधां ठाव देतात साधु ।
खुळीं सावडीं भक्तिहीनें अनाथें ।
तुम्हांवांचुनी कोण तारील त्यांतें ॥ २४ ॥

---

१ परिणाम. २ अपात्रालाच खरोखरी दान द्यावें लागतें. जो पात्र असतो तो बहुधा निस्पृह असल्यामुळें मागतच नाहीं.

करीं भक्तिचें काम मी युक्तिवाद[1] ।
जपाचें तथा साधितों गाननादें[2] ।
तुम्हांशीं जरी होतसे वंचना ही ।
तरी आपल्या भेद चित्तांत नाहीं ॥ २५ ॥

तुम्हीं राघवा सेविलें भक्तियोगें ।
नसे साध्य तें माझिया शक्तिजोगें ।
वचें बोबड्या आपणा आळवोनी ।
मला लाभती राम आराम दोनी ॥ २६ ॥

प्रभू एकपत्नीव्रतें ख्यात झाला ।
वरी सेवक ब्रह्मचर्यव्रताला ।
धन्याची जरी थोर झाली बढाई ।
तरी त्याहुनी भक्त झाला सवाई ॥ २७ ॥

न जीं सेव्य तीं सेविलीं द्रव्यदारा ।
न जे पोष्य त्यां पोषियेलें विकारां ।
मती जाहली सर्वथा मूढ माझी ।
पुन्हा तीच ती काय सांगूं कथा जी ! ॥ २८ ॥

[3]परीसापरी आपुली भेट देवा ।
करी श्रेय कोपेंहि वा प्रीतिनें वा ।
भली एक वेळ प्रभो वक्रता ही ।
उदासीनता तीहुनी भीतिदायी ॥ २९ ॥

सदा ऐकतो राघव-प्रेम-लीला ।
मनें चिंतितो नित्य त्या माउलीला ।
जगीं वस्तुमात्रांत जो राम पाहे ।
असा बुद्धियोगी दुजा कोण आहे ॥ ३० ॥

---

१ नानाप्रकारच्या कोट्या लढवून. २ गाण्याच्या छंदानें. ३ तुमची भेट परिसासारखी आहे. परीस लोखंडाला प्रेमानें भेटो किंवा त्यावर रागानें हापटो, त्याचें सोनेंच करितो, त्याप्रमाणें आपला राग किंवा लोभ दोघेही कल्याणच करितात.

कळेना मला काय आतां करावें ।
कसें आपणा कोपितां शांतवावें ।
भवन्नामगाना पुढें चालवावें ।
कृपारोदनें वा तुम्हां आळवावें ॥ ३१ ॥

असे आर्त जो उद्धरावाच तो कीं ।
असें आपुलें ब्रीद विख्यात लोकीं ।
[1]प्रपंचीं विरागी, जड-त्राण-दानीं ।
तुम्ही गाजलां सार्थ कर्माभिमानी ॥ ३२ ॥

कधीं मी न सोडीन आतां तुम्हांला ।
सदा गात बैसेन जी नाममाला ।
मनीं योजिला एक निर्धार हाची ।
भली जोडली गांठ या पावलांची ॥ ३३ ॥

असे दारिंचा आपल्या मी भिकारी ।
तुम्हां मारितों हाक नाना प्रकारीं ।
धरोनी उभा हांव एका शिताची ।
अशी कायसी भूक या दुर्बळाची ॥ ३४ ॥

तनू वाडें[2] तीच्याहुनी चित्त मोठें ।
यशाचा निधी त्याहुनी थोर दाटे ।
कृपा आपुली त्याहुनी थोर झाली ।
तुम्ही थोरले सर्वथा सर्व कालीं ॥ ३५ ॥

प्रभूंचे तुम्ही राहिलां भक्त मागें ।
स्वयें जागुनी राखितां लोक जागे ।
जरी लोपली राममूर्ती स्वरूपें ।
तरी आपल्या नाम नांदे प्रतापें ॥ ३६ ॥

तुम्ही शैशवीं व्योम[3]संचार केला ।
पुढें यौवनीं [4]वारिधी लंघियेला ।

---

१ प्रपंच करण्याविषयीं उदास परंतु दीनांचें रक्षण करण्याविषयीं उत्सुक. २ मोठी. ३ आकाशांत फिरणें. ४ समुद्र.

धरित्रीवरी राहिलां स्वस्थ आतां ।
कवीची रुचे आपणां रीति ताता ! ॥ ३७ ॥

मनापासुनी जो करी राम-भक्ति ।
तया येतसे केवढी दिव्य शक्ति ।
तयाची कशी मर्त्यता नष्ट होते ।
तुम्ही मानवां दाविलें तत्त्व हो ! तें ॥ ३८ ॥

मुळाहूनि अंतावधी[1] तापदांनीं ।
मला गांजिलें या भवीं आपदांनीं ।
मला ऐशिया संकटीं कोण आतां ।
तुझ्यावीण गा सोडवी दीननाथा ॥ ३९ ॥

व्यथा[2] सोशिली, मानिली कर्मजोडी ।
सुखें भोगिलीं, कल्पिली पुण्यगोडी ।
कळेना परी कर्म थांबेल केव्हां ।
म्हणोनी कृपा याचितों भीमदेवा ॥ ४० ॥

असे सौख्य जों दूर तों गोड भारी ।
करीं पातल्या तेंच वाटे विषारी ।
सुखें भाविलीं सर्व तीं फोल साचीं ।
प्रचीती मला पूर्ण आली भवाची ॥ ४१ ॥

तडि[3]द्भीमनादांतुनी कैक वेळां ।
बुभुःकार मीं आपला ऐकियेला ।
विलोकूनियां व्योमगंगा[4] विशाला ।
मला भासली आपली पुच्छमाला ॥ ४२ ॥

निराधार मी हिंडलों जागजागीं ।
अनेकांस मीं याचिलें मुक्तिलागीं ।

---

१ अखेरपर्यंत. २ दुःखें भोगीत असतांना तीं पूर्वीच्या कर्माचें फळ आहेत असें मानलें, व सुखें भोगीत असतांना तीं पुण्याचें फळ आहेत असें मानलें. ३ विजेच्या भयंकर कडकडाटांतून. ४ आकाशगंगा.

नसे एकही भेटला इष्ट-दाता ।
म्हणा एकदां आपला यास आतां ॥ ४३ ॥

तुम्हीं जोडिलें प्रेम जें रामनामीं ।
श्रमावीण तें मागतों धीट हा मी ।
मुलांना सुखें आयतीं, कष्ट थोरां ।
असे न्याय हा, पाहिजे त्या विचारा ॥ ४४ ॥

धृती फारशी तीव्र नाहीं जयाची ।
परीक्षा किती पाहतां जी तयाची? ।
भवद्दास हा काळदाढेंत जातां ।
परीक्षाच ती स्पष्ट होई अनास्था ॥ ४५ ॥

सुटाया झटे मी तथापि प्रपंचीं ।
पडे, कर्म हें कोणतें यास वंची ।
बुडालों गमे, वृत्ति झाली पिशाची ।
पुढें वाट ती पाहतां जी कशाची ॥ ४६ ॥

तुम्हां आपुलें सर्वथा ब्रीद ठावें ।
असें सत्य हें मीं तरी सूचवावें ।
जिथें एक दाता असंख्यात घेते ।
असे विस्मृती पूर्ण संभाव्य तेथें ॥ ४७ ॥

बरें जाहलें कष्टलों या प्रपंचीं ।
परीवार हा जाहला मोहवंची ।
पुरे संग हा देहगेहादिकांशीं ।
प्रभू मारुती जोडिला सौख्यराशी ॥ ४८ ॥

समर्थासवें पामरीं धाव घ्यावी ।
शरण्यें न तों दूर तीं मोकलावीं ।

---

१ धैर्य. २ मीं प्रपंचांतून सुटण्याकरितां झटतों आहें तरी पुन्हां त्यांतच पडतों आहें, असें कोणतें कर्म मला फसवितें आहे कळत नाहीं. ३ खुळ्याची. ४ मोह घालून फसविणारा. ५ समर्थानें.

नदीच्या सवें धावती क्षुद्र नाले ।
समुद्रें न ते वर्जिले वेगळाले ॥ ४९ ॥

कधींपासुनी आस ठेवूनि पायीं ।
अविश्वासुनी अन्य साऱ्या उपायीं ।
असे राहिलों एक चिंतीत ठेवा ।
करा इष्ट वाटेल तें यास देवा ॥ ५० ॥

धरूं भक्ति तों आडवें कर्म येतें ।
करूं कर्म तों वर्म ठावें न मातें ।
शिकूं वर्म तों मोह पाठीस लागे ।
म्हणोनी कृपा आपुली दास मागे ॥ ५१ ॥

तुम्ही आणिलें रामनामा यशाला ।
दिली थोरवी कीं तयानें तुम्हांला ।
तुम्ही थोर कीं नाम थोर प्रभूचें ।
न हें जाणती जाणते विप्र भूचे ॥ ५२ ॥

तुम्ही मुक्तही वागतां भक्तियोगी ।
स्वतः सिद्धही रंगतां प्रेमभोगीं ।
जरी आपणां ती महायोगिता जी ।
तरी सोहळे मुक्तिचे भोगितां जी ! ॥ ५३ ॥

मला पाउलें गोजिरीं दाखवा हो ।
महानंद-दिव्यामृता चाखवा हो ।
दिसो तुष्ट वा रुष्ट वेषांत मूर्ति ।
दुजी कोणती याहुनी इष्ट-पूर्ती ॥ ५४ ॥

मनाची व्यथा फार ही ताप देते ।
सुचेना पुढें कार्य तें योग्य मातें ।
प्रसंगीं अशा ठेउनी एक निष्ठा ।
पदीं आपुल्या सर्व सोशीन कष्टां ॥ ५५ ॥

---

१ ज्ञाते. २ योग्याची स्थिति. ३ इच्छा पुरी होणें.

रवी सांडिला ग्रासुनीयां दिगंतीं ।
करें दंडुनी पाडिला इंद्र[1]-दंती ।
विटंबूनियां काळही मोकलीला ।
अशा आपुल्या लौकिकातीत लीला ॥ ५६ ॥

चपेट्यासवें मारिला जंबुमाळी ।
पुरी जाळुनी निर्मिली थोर होळी ।
शिरीं वाहुनी आणियेलें गिरीला ।
अशा आपुल्या लौकिकातीत लीला ॥ ५७ ॥

तुम्ही रामनामांतल्या व्यंजनांला[3] ।
स्वरासारखे पूरणीभूत झालां ।
किती रम्यता रामनामांत राहो ।
तुम्ही रामनामा दिली पूर्णता हो ॥ ५८ ॥

अघें नाशिती आपल्या रम्य लीला ।
भवा वारिती लोपवीती कलीला ।
मनःशान्ति आराम देती नराला ।
न कां सिद्धिदा त्या मला पामराला ? ॥ ५९ ॥

अहो मारुते साहुनी मत्प्रमादा ।
करा एकदां आपल्या सुप्रसादा ।
किती आळवूं वाढल्या शब्द-जालें ।
[4]उदारांतरीं स्नेह ये अल्प कालें ॥ ६० ॥

मुखीं आपलें नाम हातांत टाळी ।
मनीं गोजिरें ध्यान तीन्ही त्रिकाळीं ।
गुणांच्या सदा गायनीं दंग वाचा ।
असा द्या मला मार्ग काल-क्रमाचा ॥ ६१ ॥

---

१ ऐरावत. २ असामान्य. ३ राम या शब्दांत जीं व्यंजनें आहेत त्यांना पूर्णत्व देणारे स्वर तुम्हीं आहांत. ४ उदार लोकांच्या अंतःकरणांत स्नेह उत्पन्न होण्यास फार वेळ लागत नाहीं.

पदीं आपल्या वास आरामकारी ।
पिणें लोचनें स्नेह-पीयूष-वारी[1] ।
मनोभ्यंतरीं[2] भक्तिसंचार साचा ।
असा द्या मला मार्ग कालक्रमाचा ॥ ६२ ॥

कसाला मला लावितां कां कुवर्णो ।
परीक्षा न लोहास ये जी सुवर्णा ।
मदुद्धार हा कार्य जेथें तुम्हांला ।
करां यत्न जी अन्य हे कासयाला ॥ ६३ ॥

स्वरें आर्त जे आपणां आळवीती ।
तयां रक्षिजे आपली ख्यात रीती ।
अनेकां अशी पातलीसे प्रचीती ।
तरीही मला वाटते थोर भीती ॥ ६४ ॥

न ये या मला वांचवाया अपाया ।
करोनी वृथा पाहिलें मी उपायां ।
विदारावया वागुरा[3] ही भवाची ।
मला दाखवा मार्ग कांहीं नवाचि ॥ ६५ ॥

कराया प्रभो नित्य लोकोपकारा ।
तुम्ही घेतसां दिव्य लीलावतारा ।
रघूत्तंस जो देवरूपें विलासे ।
तुम्ही होतसां व्यक्त तो संतवेषें ॥ ६६ ॥

तनू व्यापिली व्याधिनें, चित्त मोहें ।
कृतांतें तथा शोषिलें आयु आहे ।
महापातकीं ग्रासिलें कर्म माझें ।
मला या अंघीं[4] तारिजे सिद्धराजें ॥ ६७ ॥

करा दंड मी सिद्ध भोगास झालों ।
परी येवढें मागणें द्या दयालो ।

---

१ प्रेमामृताचें पाणी. २ मनांत. ३ पाश. ४ संकटांत.

करा श्वान वा झाड वा मोर-राघा ।
गृहीं आपुल्या, पाउलें नित्य दावा ॥ ६८ ॥

जरी जाहली थोर बाधा भवाची ।
जरी यातना सोसवेना जिवाची ।
तरी सर्वदा दीन-दुःखापहारी ।
मना आठवी मारुति ब्रह्मचारी ॥ ६९ ॥

जरी पाहिजे तोडिली कर्मकंथा[1] ।
करीं यावया पाहिजे मोक्षपंथा ।
तरी सर्वदा भीतिसंहार-कारी ।
मना आठवी मारुति ब्रह्मचारी ॥ ७० ॥

जरी पाहिजे पापराशी जळाली ।
जरी दुर्गती पाहिजे टाळियेली ।
तरी सर्वदा मुक्तिलीला-विहारी ।
मना आठवी मारुति ब्रह्मचारी ॥ ७१ ॥

विनोदा किती यापुढें चालवां जी ।
उतावीळ ही जाहली वृत्ति माझी ।
अधीर स्थिती देतसे ताप कैसी ।
नसे आपणां काय जाणीव ऐसी ॥ ७२ ॥

मना घेरिलें सर्वथा कल्पनांनीं ।
मुखा व्यापिलें अन्यथा जल्पनांनीं[2] ।
पुरा जाहला यापरी कोंडमारा ।
प्रभो किंकरा ना गमे अन्य थारा ॥ ७३ ॥

कृपा आपुली पाहिलें या दिसांना ।
प्रपंचांतलें भोगिलें सौख्य नाना ।
कृपा आपुली जाणिलें सर्व मिथ्या ।
प्रभो सोडवा वागुरा या अनित्या[3] ॥ ७४ ॥

---

१ कर्मांची गोधडी. २ भलभलत्या बडबडीनें. ३ नाशिवंत.

भली दंडुनी साधिली वज्र-काया[१] ।
पुरी झुंजुनी नाशिली मोहमाया ।
झिजूनी स्वतः साधिलें भक्त्युपाया ।
श्रमाचे[२] तुम्ही सिद्ध जी देवराया ॥ ७५ ॥

निराधार मी येथ मारीत हांका ।
तुम्हां बैसलों वाहुनी आणभाका ।
प्रभो बालका स्निग्धनेत्रें विलोका ।
नसे आसरा अन्य या दीन लोका ॥ ७६ ॥

शिशुत्वांत अज्ञान हें रूप माझें ।
पुढें यौवनीं अन्यथा[३] ज्ञान गाजे ।
कधींही मला ज्ञान झालें न ठावें ।
म्हणोनी तुम्हां बोहतों[४] एक भावें ॥ ७७ ॥

पुरा जाणतों पातकी मी मला हो ।
मनीं इच्छितों आपुला लोभलाहो ।
तरी जाणुनी मत्स्थिती आदि अन्तीं ।
मुखानें करूं कोणत्या मी विनंती ॥ ७८ ॥

नका मोकलूं, दंड हा भीतिकारी ।
अभाग्यास या कोणता अन्य तारी ।
मुलें मूढ तीं थोर होती विचारी ।
अनन्यागतें तत्पदीं तीं बिचारीं ॥ ७९ ॥

वृथा मोह हा नाश जीवास नाहीं ।
असे ऐकिले वाद नाना मुखांहीं ।
प्रचीती मला अल्प जों ये न याची ।
मनींची न तों भीति ही जावयाची ॥ ८० ॥

भवच्चिंतना नाम हातासि आलें ।
भवत्पूजनीं प्रेम ताजें मिळालें ।

---

१ बळकट शरीर. २ तुम्ही श्रम करून सिद्ध झालेले आहांत, लोकांच्या अनुग्रहानें झालां नाहींत. ३ विपरीत ज्ञान. ४ हांका मारतों.

भवद्दर्शनीं काम निष्काम झाले ।
करावें असें रामदासें दयाळें ॥ ८१ ॥

किती वाचिलीं अर्थपूर्ण पुराणें ।
तथा ऐकिलीं कीर्तनें सावधानें ।
सुधारूं शकेनाचि वेदांत मातें ।
तुम्ही माझिया गाढ भेदा तमातें ॥ ८२ ॥

भवार्तांवरी स्निग्ध बिंदूस गाळी ।
जडां जागवी प्रीतिनें सर्व काळीं ।
मनःसंभवा अंधकारासि टाळी ।
भवज्जागृती हीच आम्हां दिवाळी ॥ ८३ ॥

दुजीं सर्वही दैवतें मोकलोनी ।
पदीं आपल्या राहिलों विश्वसोनी ।
सदा जागलों येवढ्या या इमाना ।
पिठा हा बरा फत्तराहूनि माना ॥ ८४ ॥

भल्या देणग्या सर्व नेल्या लयाला ।
मती लाविली नित्य वित्तार्जनाला ।
धनें वेंचिलीं भोगसंपादनाला ।
वृथा पोसलों भार झालों जगाला ॥ ८५ ॥

स्वरूपाविना कायसी भाग्यमत्ता ।
स्वबोधाविना कासया मानसत्ता ।
स्वधर्माविना काय त्या अर्थ वित्ता ।
प्रसादाविना कोठुनी शांति चित्ता ॥ ८६ ॥

कृपा आपुल्या मंदहासांत खेळे ।
कृपेंतूनि त्या प्रेम-निर्बंध लोळे ।
तयांतूनि ये सुप्रसाद स्वभावें ।
प्रसादामधें मोक्षलक्ष्मी विसावे ॥ ८७ ॥

रुचे आपणां त्याच वागेन रीती ।

---

१ हृदयांत उत्पन्न होणाऱ्या अज्ञानास. २ प्रेमाचा प्रवाह.

तुम्हां आवडे त्याच गाईन गीतीं ।
तुम्ही आदरां तीच सेवीन नीती ।
कधीं बालका द्याल ही स्वानुभूती[1] ॥ ८८ ॥

वचें बोबडीं आपल्या अंतराला ।
विदग्धोक्ति[2] त्या सर्व-गामी मतीला ।
कृपाकाहण्या आळवाया कराला ।
सदा लावितों ठाव द्या किंकराला ॥ ८९ ॥

दया मागतों ती न मातेंच सारी ।
तिचा बिंदु द्या तोचि विश्वप्रसारी[3] ।
कृपाबिंदुच्या गौरवा ना तुलाचि[4] ।
कितीशी अशी भूक माझी मुलाची ॥ ९० ॥

मला लेकरूं दास वा दीन कोणी ।
कसेंही म्हणा आयका दीनवाणी ।
पदीं लीन मी लोळतों पूर्ण जाणा ।
कृपेला नसे ठाव ना वा ठिकाणा ॥ ९१ ॥

तुम्हां वाहुनी वित्त-सर्वस्व माझें ।
पदीं आपल्या टाकुनी सर्व ओझें ।
करोनी सदा राहण्या पाद-सेवा ।
मला या भवीं बुद्धि द्या देवदेवा ॥ ९२ ॥

मति भ्रष्ट ही देह हा भ्रष्ट माझा ।
गिरा[5] बाटली लावुनी हीन काजा ।
भवच्चिंतनें शुद्ध हृत्कोशीं[6] जो कां ।
तिथें बैसुनी किंकरातें विलोका ॥ ९३ ॥

कवीच्या न या कल्पना, या न कोट्या ।
भिडेच्या न या याचना सानमोठ्या ।
भवाच्या दवें तापल्या कोकिळाचा ।
असे घोष हा आंतड्याच्या पिळाचा ॥ ९४ ॥

---

१ आपला अनुभव. २ सुभाषितें. ३ साऱ्या जगाला पुरण्याजोगा. ४ तुलना.
५ वाणी. ६ हृदयाचा निधि.

तुम्हां पामरीं सर्वदा आळवावें ।
स्तवावें, स्मरावें, नमावें, भजावें ।
इथें संपलें सर्व कर्तव्य साचें ।
प्रसादाकडे कायसें काम त्यांचें ॥ ९५ ॥

स्तुती कार्य हें मन्मति-प्रेरणेचें ।
मतिस्फूर्ति हें चिन्ह पापक्षमेचें ।
क्षमा खूण साक्षात्कृपानुग्रहाची ।
प्रसाद प्रभो आपला मोक्ष हाची ॥ ९६ ॥

असावी मनीं मूर्ति, तेथें ठसावी ।
जनीं चिंतनीं तीच डोळां दिसावी ।
बसावी पदीं भक्ति तेथें बसावी ।
कधींही मला मोहबाधा नसावी ॥ ९७ ॥

प्रपंच्यांतल्या खुंटवा येरझारा ।
उपाधी तथा आधि निःशेष वारा ।
मनाची महाव्यग्रता दूर सारा ।
पदासंनिधीं ठाव द्या या कुमारा ॥ ९८ ॥

नको संपदा देह-गेहादि-वृद्धि ।
नको सर्वथा लौकिकाची समृद्धि ।
नको ज्ञान वा स्वर्गसंचार साचा ।
पदीं ठाव द्या मागणें हें त्रिवाचा ॥ ९९ ॥

सिधा बोल हा बोबडा बाळकाचा ।
कशाला मनीं गर्व वाहूं तयाचा ।
पदें गोड तीं आपुल्या देणगीचीं ।
कडूं राहिलीं माझिया मालकीचीं ॥ १०० ॥

केलें म्या साधुदासें निज[3]दुरितलयाकारणें या शतीतें ।
अन्यांनीं लाभ घ्यावा तरि पढुनि सदा भक्तिभावेंचि तीतें ।
प्याया दूध स्वताला गति उघड असे गोस्तनीं वासराची ।
पान्हा तो दुग्ध-लाभास्तव इतर जनां होतसे आसराचि ॥१०१॥

---

१ संग. २ चिंता. ३ आपल्या पापाचा नाश करण्याकरितां.

मराठी ग्रंथ संग्र
03104 3
ठाणे.

# श्रीरामशती स्तोत्र.

( शिखरिणी वृत्त. )

धराऽधारा[1]! धारा[2]-धर-मधुर-धीराकृति-धरा ।
शुभाकारा! कारागृह[3]-पतित भक्तां हितकरा! ।
कृपा-पारावारा[4]! प्लवग-परिवारा[5]! धृतशरा! ।
नमस्ते चित्सारा[6]! रघुकुलवरा संसृति-हरा[7] ॥ १ ॥

अरूपाच्या रूपा सहज अगुणाच्या अथ गुणां ।
कळेना वंदावें अचतुर-मनें मी तरि कुणा ।
जयाच्या थोरांना अकलं[8] गमल्या वैभव- खुणा ।
मुकें माझें त्याच्या नमन चरणा पूर्ण-करुणा ॥ २ ॥

प्रभो! माझी स्तोत्र-प्रणति[9] तव चित्तांत शिरतां ।
न दावी वक्तृत्वा, न पदरचनेची चतुरता ।
जरी[10] ती मुग्धत्वास्तव करिल निर्माण निकरें ।
तवास्यीं एखादी स्मितलहरि, तीही मज पुरे ॥ ३ ॥

पित्याच्या प्रेमाची चटक शिशुला शब्द वदवी ।
खुळ्या त्या शब्दांना परि नच मिळे वाक्यपदवी ।
हसे संतोषानें जनक, न मुला गूढ कळतें ।
स्मिताचें त्या, तेणें परि सुख मिळे त्यास भलतें ॥ ४ ॥

नदीमध्यें अर्घ्यांजलि[11] विरुनि जाई मिसळुनी ।
परी ती तत्पृष्ठीं मृदु लहरि सोडी उसळुनी ।

---

१ पृथ्वीच्या आधारा. २ मेघाप्रमाणें सुंदर व गंभीर आकृति धरणाऱ्या. ३ बंदिवासांत पडलेल्या. ४ दयेच्या समुद्रा. ५ वानरमंडळी आहेत परिवार ज्याचा अशा. ६ ज्ञानाच्या सर्वस्वा. ७ संसाराचा नाश करणाऱ्या. ८ न कळणाऱ्या. ९ स्तोत्ररूपी नमस्कार. १० तिच्यांतील वेडेपणा पाहून तुमच्या तोंडावर जरी नुसती एखादी हास्याची लकेर चमकली तरी मला बस आहे. ११ पाण्याची ओंजळ.

तशीं माझीं वाक्यें शिरुनि तुझिया चित्तकुहरीं[1] ।
लया जातां जातां उठवितिल कारुण्य- लहरी ॥ ५ ॥

समीराची वातावरण-जठरीं लाट उठली ।
दिसेना आलेली क्षणभरि न वा तेंवि खुटली ।
तशीं लीला-रूपें सगुण नटलीं वा हरपलीं ।
तुझीं व्यक्ताव्यक्तें[2] मनसम जडा नित्य लपलीं ॥ ६ ॥

महा-शून्या[3]-मध्यें अमित कुळवाडी वसविली ।
नभीं नक्षत्रांची विलग उतरंडी बसविली ।
ग्रहांचीं खेळाया चपळ[4] वलयें[5] सोडुनि दिलीं ।
निराळीं[6] पाण्याचीं[7] अति मधुरशीं पोहति तळीं ॥ ७ ॥

दिगंतांच्या भिंतींवरुनि दिधले रंग भंवते ।
पताका कीर्तीची विमल सुरगंगा फडकते ।
घटीं[8] नाद-ब्रह्मापरि निज गृहीं राहसि मुका ।
लपोनी तूं स्वामी प्रकटवुनि संसार इतुका ॥ ८ ॥

दिसावें त्वां तेव्हां जगचि हरपावें, त्रिभुवनें ।
असावें, त्वां तेव्हां जगदुदर-गर्भात[9] दडणें ।
तुझ्या रूपा आतां मनुज निरखी कोण कसला ।
निजच्छंदें जेथें घडविसि लपंडाव असला ॥ ९ ॥

तथापि स्वानंदास्तव तुज शरीरी समजुनी ।
तुझ्या नाना धर्मां बहुतपरि वाखाणति मुनि ।
तुंवां[10] इच्छामात्रें जगचि नसतें जें उभविलें ।
तुला त्यानें देही करुनि ऋण सव्याज दिधलें ॥ १० ॥

---

१ हृदयांत. २ दिसणारीं आणि न दिसणारीं. ३ मायेमध्यें. ४ फिरतीं. ५ कडीं. ६ आकाशांत. ७ मेघ. ८ भांड्यांत नाद ज्याप्रमाणें लपून राहतो त्याप्रमाणें. ९ जगाच्या पोटांत. १० तूं आपल्या इच्छेनें जगांतील लोकांना नसता जन्म घ्यावयाला लावलास म्हणून त्यांनीं तुला अवतार घ्यायला लावून तुझें ऋण तुला व्याजासह परत केलें असा भाव.

जनांच्या इच्छेनें प्रभु परम तूं नाटक-गुणी ।
भुकेला भावाचा बनसि अवतारी उपजुनी ।
अनामा नामातें धरिसि अगुणीही गुण तसे ।
अरूपीही रूप प्रकटविसि तेव्हां सुबकसें ॥ ११ ॥

नभाच्या गाभ्याला अवयव निघाले चिमुकले ।
सुनीलाचें पाणी अति मृदु करें त्यातरि दिलें ।
स्मितानें प्राचीच्या मधुनि मधुनी रंजवियलें ।
तुझें ऐसें रूप प्रिय सगुण वेल्हाळ नटलें ॥ १२ ॥

गुलांबाची गालीं, कमल-कलिकांचीहि चरणीं ।
दिसे त्या चाफ्याची चिरवसति नाकीं, सुदशनीं ।
कळ्यांची कुंदाच्या, जणु[1] नवल ही पेठ असली ।
फुलांनीं त्वन्नीलोत्पलसदृश-देहीं वसविली ॥ १३ ॥

प्रचंडा दोर्दंडा[2]कडुनि जन घेतात अभया ।
धनुर्वक्रा[3] जी भ्रू सरळ उपजे तींतुनि दया ।
शरीराचें काळ्या विमल यश, कित्येक दुजियां[4] ।
विरोधांना हेही उचितचि विपर्यास[5] तुझिया ॥ १४ ॥

किरीटाग्रीं तारागण-सदृश रत्नें झळकती ।
खडावांचीं मोत्यें पदतळ-समीपांत रुळती ।
वरी आकाशातें जलनिधिस खालीं धरुनिया ।
विराटाच्या[6] रूपा प्रकटविसि मूर्तींत जणुं या ॥ १५ ॥

---

१ तुझ्या निळ्या कमळासारख्या देहाच्या आश्रयानें फुलांनीं जणूं एक विलक्षण पेठच वसविली आहे. २ बाहुदंडाकडून. ३ धनुष्याप्रमाणें वांकडी. ४ दुसऱ्या. ५ विरोध. प्रचंड अशा तुझ्या बाहुदंडापासून भय उत्पन्न न होतां अभय मिळतें, धनुष्यासारख्या वांकड्या भुवईपासून कोप निघत नसून दयाच निघते, तुझ्या काळ्या देहाचें यश काळें नसून धवल आहे, हे विरोध तुझ्या अंगीं असणाऱ्या दुसऱ्या कित्येक विरोधांना साजेसेच आहेत. ६ तुझ्या विराट स्वरूपाच्या डोक्यावर आकाशांतील तारे आहेत व पायाखालीं समुद्रांतील मोत्यें आहेत. त्याच विराट स्वरूपाचें तूं आपल्या सगुणमूर्तींत अनुकरण केलें आहेस, कारण तुझ्या किरीटावरचीं रत्नें आकाशांतील ताऱ्यांसारखीं आहेत आणि पायाखालीं पादुकांवरील मोत्यें आहेत.

पिसांचें माराच्या स्तबक मुकुटीं फार खुललें ।
तयाखालीं डोकावत उतरले केश कुरळे ।
कचांच्या रंगाशीं निटिल बहुधा एकवटलें ।
[1]कळेना त्यायोगें कुरळ कुठलें भाल कुठले ॥ १६ ॥

कपाळीं कस्तूरी-तिलक, तनुला चंदन-उटी ।
धनूतें भात्यातें लटकुनि दिलें बाहु-निकटीं ।
कटिप्रांतीं पीतांबर, कमल लीलेस्तव करीं ।
तवांगीं हीं चिन्हें उपजविति सौंदर्य-लहरी ॥ १७ ॥

कटाक्षीं स्नेहाच्या मधुर-रस-धारा झिरपती ।
स्मितामध्यें वाक्यें वरद अभयातें सुचविती ।
समाधीचा साक्षादनुभव खऱ्या दर्शन-सुखीं ।
तुझीं किंवा गात्रें सुखचि वमती शंभर मुखीं ॥ १८ ॥

गुणांनीं अव्यंगा, अति रुचिर रूपें प्रियतमा ।
कुलानें निर्दोषा विमल-तम शीलें निरुपमा ।
अयि श्री वैदेही-धव! तव सुधा-मूर्ति असली ।
कितीका धन्यांच्या नयन-विषयांतें गवसली ॥ १९ ॥

जनीं ओतप्रोत स्थित अससि जाणूनहि असें ।
तुझ्या लीलामूर्तीस्तवचि भजकांना बहु पिसें ।
असावा ध्यानाचा विषय नयना दृश्य पुढतीं ।
प्रवृत्ति प्रेमाची सकलविदिता ही त्रिजगतीं ॥ २० ॥

विनोदाच्या कोट्या, तव-भजन-पूजादिक तथा ।
अनन्य प्रेमाची शपथ, मृदु हांका, गुणकथा ।
अशीं जीं द्वैताचीं बहुविध जनां लभ्य कुतुकें ।
गमे अद्वैताचें सुख पुढति त्यांच्या बहु फिकें ॥ २१ ॥
लयाला जाणारें सगुण असलेलें पुरवलें ।
तुझ्या रुक्ष ब्रह्म-स्थितिपरिस तें फारचि भलें ।

---

१ केंसांचा रंग आणि कपाळाचा रंग जवळजवळ सारखाच असल्यामुळें केंस कोणचे आणि कपाळ कोणचें हेंच समजत नाहीं. २ सगुणरूपाकरितां.

वा. क्र. १५६५

दिसेनासें झालें तरि सगुण रूपींच मुरतें ।
नदी सिंधूमध्यें शिरुनि सलिलाकार उरते ॥ २२ ॥

निराकारापेक्षां म्हणुनि जलद-श्यामल भला ।
गमे माझ्या चित्ता प्रियकर, म्हणा मूढ मजला ।
सुगंधी वायूच्या लहरिहुनि अज्ञान शिशुतें ।
गुलाबाचें ताजें कुसुम फुललेलेंच रुचतें ॥ २३ ॥

तुझ्या श्रीरूपाच्या स्थिति गति तथा मूर्ति कसल्या ।
उठाठेवी[1] अप्रस्तुत मजसमानास असल्या ।
स्वताची सर्वस्वी विसरुनि अति क्षुद्र पदवी ।
भ्रमग्रस्ता माझी मति मज असंबद्ध[2] वदवी ॥ २४ ॥

प्रवृत्ति स्तोत्राची त्रिभुवनगुरूच्या झडकरी ।
पदानें एकेरी जरि करुनि गेलों अवसरीं ।
जगत्साक्षी तूं तें तरि मम मदांधत्व न गणी ।
विशुद्ध प्रेमाची वसति असते एकवचनीं ॥ २५ ॥

जनीं शिष्टाचार प्रबल, परि ते कृत्रिम पुरे ।
तयां पाळी जो तो चतुर नर दंभांतचि मुरे ।
नको त्वत्सांनिध्यीं मजसि उपचारादिक कदा ।
स्वमातेच्या ठायीं शिशुस कसला आडपडदा ॥ २६॥

मनाच्या जे गर्भीं मुकुलित[3] मनोभाव दडती ।
तुझ्या उद्देशें ते बहुगुणित बाहेर पडती ।
न ही माझी विद्या, परि तव कृपेचीं शुभ सुखें ।
समुद्रा भेटाया फुटति सरितेला शत मुखें ॥ २७॥

अनाथांचा वाली, पतित दुबळ्यांचा प्रिय धनी ।
भल्यांचा कैवारी, रिपु खल-कुलाचा त्रिभुवनीं ।
जिव्हाळा धर्माचा, बुध-हृदय-पंकेरुह-शशी ।
जगाच्या कल्याणा उचित गुणवत्ता तव अशी ॥ २८ ॥

---

१ या उठाठेवी मला निरुपयोगी आहेत. २ भलतें सलतें. ३ अव्यक्त असलेले.

बुडाल्या धर्माला उजळवुनि निर्दोष करणें ।
खलांना मर्दोनी सुजन निज हातांत धरणें ।
स्वभक्तींचीं तत्वें विशद करणें सात्विकं[1] मदें ।
तुवां एकें ऐशीं विमल मिरवावींत विरुदें[2] ॥ २९ ॥

दुरात्म्या दैत्यांच्या रग भुजबळाची जिरविली ।
स्वभक्तांच्या हौस प्रणयि[3] हृदयांची पुरविली ।
निधानें सौख्याचीं अपरिमित लोकीं वसविलीं ।
तुवां स्वस्वाराज्यीं लिपिच दुरिताची पुसविली ॥ ३० ॥

स्मराया पायातें तव समय लागेल जितुका ।
तुला दीनोद्धारास्तव कधिंच लागे न तितुका ।
मुखें तूतें गात्यां, तुजमधिंच रूपें निवसत्यां ।
धनी तूं भक्तांना सुलभ जपमात्रेंच नुसत्या ॥ ३१ ॥

दलांची[4] रम्य[5] श्री, रसमय मधूची विपुलता ।
सुगंधाच्या लाटा, विकच[6] कमला[7]ऽसार डुलता ।
जसा वेडावावा भ्रमर असल्या पंकजवनीं ।
तशी माझी झाली स्थिति तव विभो स्तोत्र-करणीं ॥ ३२ ॥

निवेदावीं दुःखें तुजसि कृति-बांधाच तरि ती ।
कथावीं गाऱ्हाणीं तरि अजुनि झालीं न पुरतीं ।
स्वपापें सांगावीं तरि तुजपुढें तीं न ठरतीं ।
तुला माझी आतां कशि समजवूं दुर्धर गती ॥ ३३ ॥

अभीष्टा मागोनी तुजजवळि घ्यावें दृढ असा ।
मनामध्यें होता प्रथम मज देवा भरंवसा ।
तुझ्या दानामध्यें परि न दिसतें व्यंगचि मला ।
दिल्यामध्यें राखी कसर जन तो नाथ कसला ॥ ३४ ॥

दिलेल्या बुद्धीच्या बहु दुरुपयोगास करुनी ।
प्रपंचाच्या नादें तव चरण गेलों विसरुनी ।

---

१ सत्वगुणी अहंकारानें. २ बाणे. ३ प्रेमळ. ४ पाकळ्यांची. ५ सुंदर शोभा. ६ उमललेला. ७ कमळांचा समुदाय. ८ कर्मांचीं फळें.

पुढें पश्चात्तापें रडत बसलों संकुल[१] तमीं ।
किती ऐसे सांगूं तुज मदपराध प्रबल मी ॥ ३५ ॥

नव्हे हा सामान्य प्रखर अनुताप त्रिभुवनीं ।
त्रिताप-ग्रंथाची अति विकट वाटे पुरवणी ।
दुजां[२] तापां छाया-व्यजन-जलयोगें शमविती ।
उतारा या तापावरि विदित नाहींच जगतीं ॥ ३६ ॥

पुराणांचें पारायण करुनि अर्थास चुकलों ।
करोनी वेदांतश्रवण परमार्थास मुकलों ।
पढोनी सद्ग्रंथावलि पढतमूर्खत्व शिकलों ।
वृथा संसाराच्या अति गहन पाशास विकलों ॥ ३७ ॥

कथेच्या गूढार्थां त्यजुनि भलत्यालाच फसलों ।
खुणांच्या वाक्यांना टकमक विलोकीत बसलों ।
अकालीं अस्थानीं सकल मम पांडित्य पडलें ।
जळो विद्या माझी वय फुकट देवा दवडलें ॥ ३८ ॥

धनाचा मी भोगीं, सतत परपीडेंत मतिचा ।
मदांधानें केला व्यय कुजनसेवेंत कृतिचा ।
असा ठायीं ठायीं भ्रमण करतां त्याज्य ठरतां ।
तुझ्या शेवीं आलों शरण पदकंजास परता ॥ ३९ ॥

प्रमादांचा पाडा, दुरिततति[३] ही घोर अथवा, ।
अधःपाताचा हा परिसुनि मम स्पष्ट पथ वा ।
असेल क्रोधाचा क्षण तव मनीं भाव उठला ।
कृपेच्या ब्रह्माला तुजसि अथवा कोप कुठला? ॥ ४० ॥

तथापि क्रोधाची जरि तव मनीं होय वसती ।
फळें त्यांचीं भक्तां तरि न अशुभातें वितरती ।
म्हणोनि[४] क्षुद्रांच्या चपल वरदानाहुनि भला ।
तुझा देवा कोप प्रखर घडलेला पुरवला ॥ ४१ ॥

---

१ गाढ. २ दुसऱ्या तापांना छाया, पंख्यानें वारा घेणें वगैरे उपाय आहेत, पण पश्चात्तापाला कोणताही उतारा नाहीं असा भाव. ३ पापांची मालिका. ४ याकरितां क्षुद्र देवतांच्या नाशिवंत प्रसादापेक्षां तुझा भयंकर राग झालेला पतकरला.

प्रसन्नें त्वां भक्तां-प्रति वितरली आत्मपद्वी ।
वधोनी क्रोधानें रिपुंसि उतरीलें भवदवीं ।
पराकाष्ठा–रुष्टें सदयहृदयें वा स्मितकरें ।
दिलें त्वां कल्याणाविण निज जना काय दुसरें ? ॥ ४२ ॥

असे मी धिःकारोचित समजुनी हें निज मनीं ।
जरी औदासीन्य प्रवल उसनें आणिसि क्षणीं ।
तरी नाना-भावीं करुणरसं[1]कल्लोळ-परमीं ।
विलापांनीं माझ्या करिन तुजला स्नेह-पर मी ॥ ४३ ॥

[2]अहंता ही माझी खचितचि निराधार सगळी ।
प्रसाद-प्राप्तीला तव सदयता कारण वळी ।
घडे पंखा वातावरणजठरीं ऊर्मि–जननीं ।
निमित्ताला हेतु, प्रकृति पवनाची प्रसरणीं ॥ ४४ ॥

प्रसादा मागावें त्वरित फल द्यावें उचितसें ।
[3]कृपा-याञ्चा-वांच्छा-फलन-विषयीं भेदचि नसे ।
खपेना चित्ताच्या तव विकसना कालगणना ।
रवीचा आ[4]यान-क्षण नयनलाभ त्रिभुवना ॥ ४५ ॥

वदायाच्या ओघीं वच वदुनि जाईन भलतें ।
मला मूढा माझें हित अहित कांहीं न कळतें ।
विचारी तूं देवा म्हणुनि अविचारी मज अशा, ।
हिताशीं संयोजीं उचित, चुकवाया अवदशा ॥ ४६ ॥

---

१ करुणरसाच्या लाटांनीं भरलेले. २ मी तुला प्रसन्न करीन हा माझा अहंकार व्यर्थ होय, कारण तुझ्या प्रसादाला कारण तुझें सदयत्वच आहे. पंख्याच्या योगानें वातावरणांत लाटा उत्पन्न होतात पण यांत पंख्याची फारशी तारीफ नाहीं. वायु प्रसरणशील आहे म्हणून पंख्याला लाटा उत्पन्न करितां येतात असा भाव. ३ प्रसाद मागणें आणि प्रसाद होणें यामध्यें अंतरच नाहीं. ४ येण्याची वेळ, सूर्याचें येणें आणि लोकांना दिसूं लागणें या गोष्टी एकदम होतात, त्याप्रमाणें तुजजवळ प्रसाद मागणें आणि तो मिळणें या गोष्टी एकदम होतात असा भाव.

अभक्तां, पांखंडां[१], सुकृतनिरतां[२], पापमतिकां[३] ।
तुझा आल्यां गेल्यां उघड दरवाजा सकलिकां ।
अपेक्षा पात्राची, न धरिसि वयाची ताशि कदा ।
जगत्त्राणासाठीं कर उचललेला तव सदा ॥ ४७ ॥

क्षमौदार्य-प्रेमप्रभृति तव ज्या ज्या गुणकला ।
जनांच्या श्रेयाला सम[४] उचित त्या होति सकला ।
वसंतीं उद्यानीं फुलति बहु जीं मोगरिफुलें ।
तयांमध्यें मोठें कवण म्हणिजे वा चिमुकलें ॥ ४८ ॥

कवित्वें वाल्मीकि प्रिय तुजसि झाला अतिशयें ।
तसा तारासूनू[५] शिशु-सहज-मुग्धें[६] अभिनयें ।
हनूमान् सेवेनें प्लवगपति[७] तो स्नेह-निर्करें[८] ।
तुझें वेधायातें हृदय कसलाही गुण पुरे ॥ ४९ ॥

फळें जी भिल्लीनें कुठुनि तरि रानीं जमविलीं ।
तुवां त्यांनीं सीताधर-मधु-पिपासा[९] शमविली ।
प्लवंगांच्या हातीं पद चुरुनि घेतां खर नखें ।
तुला देतीं झालीं मलयंजउटीचीं[१०] मृदु सुखें ॥ ५० ॥

शिला-खंडें मंचास्तव[११], तृणहि शय्येस्तव, तशा ।
सुखें केल्या अंगांकित जरठ शाखा जणुं उशा ।
तुवां लक्ष्मी-कांतें सकल-सुखकल्पद्रुम अशा ।
निशा रानीं नेल्या क्रमुनि कपिसंगें कसकशा ॥ ५१ ॥

स्त्रियांमध्यें एकीप्रति[१२] वध, दुजीला[१३] अवकळा[१४] ।
दिली त्वां, शत्रूचा अनुज परि राज्यीं बसविला ।

---

१ नास्तिकांत. २ पुण्यवानांना. ३ पाप्यांना. ४ क्षमा, औदार्य, प्रेम वगैरे तुझे जे गुण आहेत ते सारखेच लोकोपयोगी आहेत, त्यांत लहानमोठा असा भेद नाहीं. ५ अंगद. ६ लहान मुलांना स्वाभाविक अशा अल्लड चेष्टांनीं. ७ सुग्रीव. ८ पराकाष्ठेच्या मैत्रीनें. ९ सीतेचें अधरामृत पिण्याची इच्छा. १० चंदनाच्या उटीचीं. ११ पलंगादाखल. १२ ताटका राक्षसीला. १३ शूर्पणखेला. १४ विटंबना.

अनन्य-प्रेमी जो भजक बहु त्या कष्ट भरता ।
तथा सौमित्रीला अमित उपवास व्रत-रता ॥ ५२ ॥

अशोकाचे शोक, श्रमपरिहराच्या[1] श्रमततीं[2] ।
असंगाचीं[3] नातीं त्रिभुवनपतीच्या वनगती ।
फलें हीं कर्माचीं तव, गहन वा केलि-रचना ।
कळेना, ज्यायोगें घडति जगदुद्धार-घटना ॥ ५३ ॥

नको जी ती केली कठिण जननीगर्भवसती ।
खलांच्या हातींच्या बहु सहन केल्या अपकृती ।
अलंकारांऐसे व्रण निज-शरीरीं मिरविले ।
तुवां भक्तासाठीं श्रम अमित सानंद वरिले ॥ ५४ ॥

तुला सद्भक्तांची परमरुचि भक्तांप्रति तुझी ।
नसे अन्योन्यांच्या स्मृतिविण तुम्हां आवड दुजी ।
रहस्य प्रेमाचें शिकविति चरित्रेंहि तुमचीं ।
जनांच्या भक्तीचीं उपजविति चित्तीं अभिरुचि ॥ ५५ ॥

तुम्हां भक्तां ऐक्य स्थिर, दिसतसे भेद नुसता ।
चरित्रीं द्वैताची उगिच तुमच्या ती विषमता ।
अभेदाचें घेतां परम सुख भेदीं बहुपरि ।
जिची ना अद्वैतीं परिणति[4] न ती भक्तिच खरी ॥ ५६ ॥

न जाणे ना ऐके, नच समजतों नातरि पुसे ।
अहंकारें ज्याला गमति सुजनव्रात[5] रिपुसे ।
असा मी अन्यायी तरिहि पदरीं घे समजुनी ।
तुझ्यापाशीं कांहीं असति नवलें मत्सम जुनीं ॥ ५७ ॥
घड्याळाचा कांटा क्रमित निज मार्ग श्रमभरें ।
पुन्हा येतो एकावरि फिरुनियां द्वादश घरें ।

---

१ श्रम नाहींसे करणाराच्या. २ कष्टांची परंपरा. ३ तूं शोक नाहींसा करणारा असून तुला शोक झाला, लोकांचे श्रम नाहींसे करणाऱ्या तुला श्रम सोसावे लागले, निसंग असणाऱ्या तुला नात्यांनीं बांधून घ्यावें लागलें हीं तुझ्या कर्माचीं फळें आहेत कीं लीला आहेत. ४ शेवट. ५ सज्जनांचा समुदाय.

तसा नाना योनी भ्रमत नरदेहांत पडुनी ।
अधःपाताला मी प्रवण[१] बनलों हाय इथुनी ॥ ५८ ॥

कितीदां जन्मावें पुनरपि मरावें कितिकदां ।
कितीदां हर्षावें विलपत बसावेंहि कितिदां ।
मृषा[२] संसाराच्या खडतर खऱ्या फार विपदा ।
अपेष्टांची माझ्या करिसि वद आतां मिति कदा ॥ ५९ ॥

कुणासंगें बोलूं वद तुजविणें आळवुं कुणा ।
कुणा अन्या होऊं शरण पतितोद्धार-निपुणा ।
नसे आतां जागा मजसि तुजवांचून दुसरी ।
स्वयें तारी मारी, मजसि नच सारी परि दुरी ॥ ६० ॥

तुझ्या गानीं माझी मति सहज मोदा अनुभवी ।
भविष्यत्[३] श्रेयाची मम खचित ही साक्ष बरवी ।
शुभेच्छा[४]-संभूति प्रथम, तव पायीं मग रुचि, ।
पुढें मुक्ती, वाढी अशि विदित कल्याण[५]-तरुची ॥ ६१ ॥

असे मी अन्यायी करि मजसि दुर्भाषण भलें ।
पित्यानें दंडावें उचितचि जरी मूल चुकलें ।
करा शिक्षा अन्याकडुनि अथवा तीव्र करवा ।
मुलासंगें देवा दृढ परि अबोला न बरवा ॥ ६२ ॥

तुवां रागेजावें, विलपत बसावें सतत मी ।
स्मितानें म्या जावें तव गढुनि मोदांत परमीं ।
मिषानें कोण्याही स्तविन तुजला या भवदवीं ।
दिशेनें सूर्याच्या रविकमलही तोंड फिरवी ॥ ६३ ॥

मला चिंता माझी, तुज परि जगाचीच सकला ।
अधीरत्वें माझ्या कृपण हृदयीं स्वार्थ पिकला ।
कराया विश्वातें रवि उगवतो डोळस भला ।
तरी वेडे पक्षी करिति तरुगर्भी कलकला[६] ॥ ६४ ॥

---

१ उन्मुख. २ मिथ्या. ३ पुढें येणाऱ्या कल्याणाची. ४ चांगल्या इच्छेचा उद्भव. ५ कल्याणरूपी वृक्षाची. ६ किलबिलाट.

कुठें सिंधू ? त्याचें लवण कण शोषी रवि करें ।
कणांचे त्या राशी क्षितिस पडती थोर निकरें ।
जलानें त्या ऐशा सकल भिजते ही गुरु मही ।
तुझे धागे ऐसे बहु गहन कल्याणकरही ॥ ६५ ॥

बरें जें भासे तें अशुभ परिणामींच ठरतें ।
दिसाया जें पीडाकर सुखद तें होय पुरतें ।
सुखें दुःखें माझीं म्हणुनि तव पायावरि भलीं ।
विचाराशक्तें म्यां शुभ समजुनी वाहुनि दिलीं ॥ ६६ ॥

समस्तांना आशाजनक बहु हा काल, परि तो ।
विरोधी[1] दृश्यांनीं मज बहुत साशंक करितो ।
सुखें कां लंकेशाप्रति, बहुत कां कष्ट भरता ।
तुझ्या या लीलेचा कवण समजे हेतु परता ॥ ६७ ॥

शिशुत्वाचे धागे मधुर परि बाल्यांत तुटले ।
पुढें त्या बाल्याचें सुख युवदशेमाजि खुटलें ।
सुत-स्त्री-मित्रांनीं तरुणपणिचें श्रेय लुटलें ।
मला दुर्भाग्याला क्षिति-तळवटीं सौख्य कुठलें ॥ ६८ ॥

कधींचें तें पूर्वार्जित गुरु-कृपेमाजि फळलें ।
गुरूक्तीनें सीताधव ! तव खरें रूप कळलें ।
निदिध्यासें[2] तूझ्या दुरित सगळें दूर टळलें !
नको आतां मिथ्या सुख, विषय[3]-संकेत गळले ॥ ६९ ॥

फुलामध्यें मंद स्मित, मधुर संगीत विहगीं ।
तुझी होते तैसी प्रकट मज मूक स्थिति नगीं ।
समीराच्या देती मज तव तनुस्पर्श लहरी ।
तुझ्या लीला ऐशा मज कुतुक देती बहुपरी ॥ ७० ॥

अनेकां विश्वांचा असंसि हितकर्ता म्हणुनियां ।
मनुष्याचें कोतेपण परि न दृष्टीस तुझिया ।

---

१ परस्परविरोधी देखाव्यांनीं. २ चिंतनानें. ३ सुखोपभोगाच्या साधनांचें कौतुक.

गमे जो यावासा सहज वचकेमाजि तरणी[1] ।
अनंत ब्रह्मांडें धवल करितो तो स्वकिरणीं ॥ ७१ ॥
सुखें घाली जन्मा मज परि तुझें ध्यान घडवी ।
सुखें पाडी कर्मी मज परि असंगत्व पढवी ।
सुखें दंडी मातें परि करि न दूर स्वचरणा ।
अशी शिक्षा-भिक्षा मज सतत दे विश्वशरणा ॥ ७२ ॥
विनावाचा नाम-स्मरण तव निःशंक करवे ।
विनादृष्टी आतां निरखिन तुझें रूप बरवें ।
कृपेनें संतांच्या मजसि कळल्या या नव कला ।
पुरेसा होईना जरि मम तयां देह विकला ॥ ७३ ॥
कृपेचा ओलावा तव बहु तिचा वेग अथवा ।
जसा पूर्वी होता अजुनिहि असे त्यापरि नवा ।
तयाचें नावीन्य क्षणभरि कधींही न तुटलें ।
नदीच्या पारोसेपण विमल नीरास कुठलें ॥ ७४ ॥
मनें जें चिंतावें क्षणहि न असें कर्म सुचलें ।
मला मोठे मोठे दुरित-कर ते दोष रुचले ।
अघांच्या भारानें मम मति पहा पूर्ण खचली ।
असा पापी गोळा तुजविण विभो कोण उचली ॥ ७५ ॥
मला निस्संगत्व प्रथम बरवें दे, नच जरी ।
असें तें द्यायाचें, तरि मजसि सत्संगत करी ।
नसे वा त्यातेंही सवड तरि दुःसंगति बरी ।
परी तीच्यामध्यें तव-पद-निदिध्यास वितरी[2] ॥ ७६ ॥
स्थितीच्या ज्या उंचीवरुनि जल खालीं उतरतें ।
दुहेरी वेगानें पुढति तितुकें उंच सरतें ।
तुझा तैसा अंश प्रथम जरि मी भ्रष्ट बनलों ।
तरी आतां पायीं त्वरित तव येण्यास सजलों ॥ ७७ ॥
जरी नाहीं झाली मजसि उचलाया तव मति ।
तरी देई वेगें मज निज करानें अवगति ।

---

१ सूर्य. २ देई.

अधः-पातें चेंडू शतगुणित वेगें वरि चढे ।
तसा मी येईन त्वरित चिकटाया तुजकडे ॥ ७८ ॥
जगीं मोठ्या शक्ती सहज वश होती धन-गुणां ।
स्वरूपाची लागे अभिरुचि तथा लौकिक जना ।
सभाग्याचे होती सकल अभिमानी, अशरणा ।
अभाग्याचा वाली कवण परि देवा तुजविना ॥ ७९ ॥
फुलें पानें साली सरस फळमूळें बहु अशीं ।
लतेचीं पंचांगें पडति जन-काजास्तव जशीं ।
मनो-वाणी-देह-द्रविण[1]-गुण[2]-मत्ता मम तशी ।
कदा सेवेसाठीं उचित जगताच्या बनविशी ॥ ८० ॥
तुझ्या ऐशीं श्रेयस्कर सकल गात्रें तव मुळीं ।
महा कल्याणांची तव तनु असे मूर्त पुतळी ।
शुभाकारा जी कां शुभकरचि होती गुण तिचे ।
कशासाठीं सामुद्रिक[3]फल बघावें सुरभिचें[4] ॥ ८१ ॥
जनांच्या लाजेची मजसि नुरली लेश परवा ।
दिली पायीं डोई सुखकर घडो दुःखकर वा ।
कुणासाठीं आतां सदनविभवीं आवडि धरूं ।
कशाला मोलानें कुटिल-जन-सेवा पतकरूं ? ॥ ८२ ॥
खलाला तारावें खचित अनवस्था[5]-समय हा ।
तरीही तूं देवा निज-बिरुद-कीर्तीसचि पहा ।
पदीं येणारातें त्यजुनि यश जें होय मळलें ।
बरें त्यांच्या[6]पेक्षां बहु अधम उद्धारुनि दिले ॥ ८३ ॥
बरें झालें आलों शरण तुजला या अवसरें ।
नसे आतां कांहीं मजसि उरलें इष्ट दुसरें ।
सुखारामीं रामीं मन जडुनि गेलें चहुंकडे ।
पुढें मागें खालीं वरि सतत कैवल्य[7] उघडे ॥ ८४ ॥

---

१ धन. २ गुणीपणा. ३ अंगावरील चिन्हांचें फळ. ४ कामधेनूचें. ५ विपरीत प्रसंग. ६ मी उद्धार करण्याच्या लायकीचा नसलों तरी तुम्ही आपल्या बाण्याचा लौकिक संभाळा. शरण आलेला पापी टाकून दिला असा एक बोभाटा होण्यापेक्षां हजार नालायक लोक उद्धरलेले पतकरले असा भाव. ७ परमेश्वराचें रूप.

तुझ्या नामासाठीं हृदय, तनु सेवेस्तव तथा ।
दिली म्यां ही वाणी अविरत कराया गुणकथा ।
करूनि श्री-रामार्पण सकल माझ्या गुणकला ।
असे झाला सीता-रमणमय संसार सगळा ॥ ८५ ॥

मनानें चिंतावे सतत रघुराया गुण तुझे ।
कथावीं एकांतीं तुजसि हृदयींचीं हितगुजें ।
तुझ्या रम्याकारा निरखत बसावें स्वनयनीं ।
अशी देई देवा स्थिति मज अखंडा निशिदिनीं ॥ ८६ ॥

गळ्याला सीतेनें पवनतनयानें पद भलें ।
तुझ्या नामा संतीं यश कविवरीं शुभ्र वरिलें ।
सुखें ऐसे वाटे तव करुनि घेवोत सगळे ।
स्वचित्तीं मी सर्वांसकट तुज सामाविन बळें ॥ ८७ ॥

तुझी माझी भेटी जलनिधि-नदी-भेट दुसरी ।
तुझ्या माझ्या गोठी सहज उभयोष्ठ[१]-स्थितिपरी ।
प्रदीपें लावावा अभिनव जसा दीप दुसरा ।
तुझ्यासाठीं तैसा स्थितिस चढलों या प्रभुवरा ॥ ८८ ॥

स्तुतीनें वाल्मिकि, स्तवन-विधिनें शंभु तरला ।
हनूमान् सेवेनें सहवसतिनें लक्ष्मण भला ।
रिपुत्वें लंकेचा पति भजक-कोटींत शिरला ।
मिषानें कोण्याही तुज चिकटला तो उतरला ॥ ८९ ॥

समीराचें हेतूविण गमन जैसे दिशिदिशीं ।
असंग व्योमाची स्थिति परम निर्लेपहि तशी ।
महाभूतें[२] ऐसी निज सहज चेष्टांतहि वशी ।
कदा त्यांच्या ऐसा मजसि निरुपाधी बनविशी ॥ ९० ॥

प्रभो आतां देई त्वरित चरणीं ठाव मजला ।
हराया मत्प्राणां सहज अथवा काळ टपला ।

---

१ दोन्ही ओंठांच्या स्थितीप्रमाणें. २ याप्रमाणें महाभूतांच्या हालचाली निर्हेतुक चालल्या आहेत.

समीरानें नेला परिमल जिचा चोरुनि अशा ।
कळी ऐसी माझी तुज दिसुनि येईल कुदशा ॥ ९१ ॥

मम देह जना, जगणें भजना । धन वाहुनिया तुझिया यजना ।
मग दास तुझा प्रभुजी उरतों । तुज आत्मनिवेदन मी करितों ॥९२॥

धन नश्वर हें तनु नश्वर ही । क्षणभंगुर ही सगळीच मही ।
अविनाश तुझें पद आठवितों । तुज आत्मनिवेदन मी करतों ॥९३॥

रविच्याहि करांस न जें दिसतें । असुनी नसतें नसुनी असतें ।
तव चिन्मय रूप असें स्मरतों । तुज आत्मनिवेदन मी करतों ॥९४॥

तनुनेंच उरूनि महीवरतीं । नवलें निरखीत जगापरतीं ।
स्व-समाधि-सुधारस ओगरितों । तुज आत्मनिवेदन मी करितों ॥९५॥

न जपें न तपें भजनें यजनें । तव रूप कळे न कथा-श्रवणें ।
म्हणुनी गुरुदिष्ट[1] पथा वरितों । तुज आत्मनिवेदन मी करितों ॥ ९६॥

कळण्यास परात्पर-रूपरुचि । पर[2] साधन एक कृपा गुरुची ।
खुणगांठ मनांत अशी धरतों । तुज आत्मनिवेदन मी करतों ॥९७॥

निरुपाधि उपाधि-वशें स्फुरतें । नुसतीच उपाधि पुढें उरते ।
तिस लोटुनिया परता सरतों । तुज आत्मनिवेदन मी करतों ॥९८॥

मम तूं तव मी बनलों सदया । करि विघ्न उपस्थित कोण तया ।
अनुभूति-सुखांत अशा रमतों । तुज आत्मनिवेदन मी करतों ॥९९॥

आलें मनास बहुधा वदलों तसेंचि ।
तें तारतम्य कसलें मजला नसेंचि ।
घालूनिया मदपराध अनंत-कोटी ।
दे आपल्या मज तयांसह ठाव पोटीं ॥ १०० ॥

तरल[3] तरणि-लागि बोटवाती । शत वचनें तुज तेवि साधुदासें ।
रघुकुल-तिलकास वाहियेलीं । रुचिर तया करिजे जगन्निवासें ॥१०१॥

---

१ गुरूंनीं सांगितलेला. २ श्रेष्ठ. ३ तेजस्वी.

ठी ग्रंथ संग्रहा

# श्रीसीताशती स्तोत्र.

( हरिणी वृत्त. )

प्रथम[1] जननि! ब्रह्मांडाच्या गुण-त्रय-धारिणी[2]!।
अमित[3]-भुवन-प्रादुर्भाव-स्थिति-च्युति-कारिणी।
रघुपति[4]-मनो-मुग्धांभोज-प्रबोधन-हेतुला।
जनकतनये सीतामाई! नमूं वरदे! तुला ॥ १ ॥

जड असुनिही स्तोत्रीं झालों प्रवृत्त कुतूहलें[5]।
सुकर परि तें होई मातें तुझ्याच कृपाबलें।
निजजननिचा स्तोत्रारंभ प्रसाद-परंपरा[6]।
प्रसवुनि सदा होतो वेड्या मुलासहि आसरा ॥ २ ॥

तुटक रचना, वेडीं वाक्यें, पुराण जुन्या कथा।
रसविरहिता भाषाशैली अशांतचि सर्वथा।
चपल शिशुच्या हव्यासाची फलश्रुति ओसरे।
करुनि जननी घेते त्याचें समस्त उणें पुरें ॥ ३ ॥

अगणित तुझे माते ! होती महागुण मापना[7]।
अनुपम गमे लावण्यश्री[8] तुझी सगळ्या जना।
स्थितिंत असल्या वानायातें तुला अयि[9]! पाहणें।
गवसणिच्च ती आकाशातें असे जणु घालणें ॥ ४ ॥

निगम[10] थकले, झाले देव त्रपाकुल[11], मानिनी[12]।
विबुधललना वेड्या ठेल्या तुझ्या गुणगायनीं।

---

१ आद्य. २ सत्व, रज आणि तम या तिन्ही गुणांना धारण करणारी. ३ अनंत ब्रह्मांडांचा उद्भव, पालन आणि नाश करणारी. ४ रामाचें हृदयरूपी सुंदर कमल विकसित होण्यास कारणीभूत होणारी. ५ कौतुकानें. ६ देणग्यांचा वर्षाव. ७ मोजण्यास. ८ सौंदर्याची शोभा. ९ अगे. १० वेद. ११ लज्जित. १२ गर्विष्ठ (देवस्त्रिया).

तदपि तव मी झालों गाना प्रवृत्त यथामति ।
पटु जन भिती जेथें तेथें सुखें शिशु नांदती ॥ ५ ॥

शिशुस रुचते माता होवो भली अथवा बुरी ।
परम निधि ती सर्वस्वाची तदीय खरोखरी ।
मग गुणखनी लावण्याढ्या जगत्त्रितयेश्वरी[1] ।
अशिच जननी ज्याची त्याची कुणास बरोबरी ? ॥ ६ ॥

त्रिभुवनगतां सौंदर्यांची जणों मुस ओतली ।
अवयवें[2]-परत्वानें रत्नें तियेप्रति जोडलीं ।
तदुपरि पुटें[3] सद्रंगांचीं मनोहर घातलीं ।
तव तनुलता व्यक्तत्वाला तयांस्तव पातली ॥ ७ ॥

सुबक बरवा बांधा, देहाकृती मनमोहिनी ।
मृदुल तनुची रेखीव श्री, अशा निकरांतुनी ।
अति मधुरता[4] साम्रग्र्यानें जशी प्रकटे तुझी ।
तशिंच गमती गात्रें रम्यें अनेक दुजीं दुजीं ॥ ८ ॥

कळि उमलुनी अंभोजांची[5] उरे वदनाकडे ।
गगन-तल तें प्राचीसंगें[6] तुझ्या चरणीं दडे ।
तनु तरि गमे सद्रत्नांचे जणों जुळले खडे ।
विमल दुसरें ऐसें कोठें क्षितीवरि रूपडें ? ॥ ९ ॥

चरणयुगुला साजेशी ती नखावलि चांगली ।
अरुण किरणश्रेणी त्यांची मनोहर फांकली ।
नमन नुसतें द्यावें, घ्यावी समाधिच रोकडी ।
कथिति जगता ऐसें वाटे सहास[7] घडीघडी ॥ १० ॥

तनय रविचे वा नातू वा सखे पणतू पुरे ।
गमति असलीं दोन्ही पायीं मनोरम नूपुरें[8] ।
रुळति चरणीं ज्या रत्नांच्या महाप्रभ[9] शृंखला[10] ।
अतिशय[11] पदीं सौंदर्याचा तयास्तव जाहला ॥ ११ ॥

---

१ त्रिभुवनाची मालकीण. २ वेगवेगळे अवयव पाहून. ३ लेप. ४ सौंदर्य. ५ कमळाची. ६ पूर्वदिशेसह. ७ मंदस्मितपूर्वक. ८ पैंजण. ९ शोभायमान. १० सांखळ्या. ११ पराकाष्ठा.

विमल चरणें जातीचीं तीं तथापि तयांवरी ।
नमविति शिरें गीर्वाणांच्या[1] स्त्रिया वरचेवरी ।
पडुनि कुसुमें तद्भालींचीं[2] तयांवरती जमे ।
अरुण[3] सुषमा[4] थोडी थोडी शिरोगत[5] कुंकुमें ॥ १२ ॥

मृदुल तळवे जे पायांचे तयांताळिं वीक्षणा ।
असाति लपुनी[6] रेषा सामुद्रिकी शुभलक्षणा ।
चरण चुंरिता[7] जो भाग्याचा मरुत्सुत, पारणें[8] ।
निशिदिनिं फिटे तन्नेत्रांचें तयां विधिकारणें ॥ १३ ॥

कमल-कलिका हातीं, कानावरी सुममंजिरी ।
बहु भरजरी ल्याली शालू मनोहर अंजिरी ।
मणिमय कटिप्रांतीं शोभे निरंतर मेखला[9] ।
तिलक निटिलीं सौभाग्याचा निदर्शक रेखला ॥ १४ ॥

वदन हंसते औदार्याच्या तरंग[10]-परंपरा ।
नयन वमती[11] वात्सल्याचा अखंड असा झरा ।
श्रवण करुणा-वाणी ऐकावया बहु सादर ।
कर हि अभया द्याया भक्तांप्रती अति तत्पर ॥ १५ ॥

मन हरखतें, वृत्ती होती प्रसन्न कुतूहलें ।
हृदय भरुनी आनंदानें अलोट उचंबळे ।
स्फुट उमटती आठी अंगीं सुखप्रद भावना ।
स्मृति तव अशा रीती पोषीतसे नयना मना ॥ १६ ॥

अमृत-किरण-स्त्रावें पाळी कटाक्ष जिचा मना ।
पदरहि करी यन्मायेचा जगत्त्रय-गोपनीं[12] ।
अविरत जिच्या कारुण्याची जगाप्रति साउली ।
असासि असली तूं विश्वाची अलौकिक माउली ॥ १७ ॥

---

१ देवांच्या. २ त्यांच्या कपाळावरचीं. ३ तांबडी. ४ प्रभा. ५ कपाळावरील. ६ दृष्टीला चोरून. ७ चेंपणारा. ८ त्या (पाय चेंपण्याच्या) कामामुळें. ९ कमरपट्टा. १० लहरीमागून लहरी. ११ सोडतात. १२ पालन.

रुळति मणि जे हारामध्यें अनेक गळ्यांतल्या ।
दिपविति गुणें ते तेजाच्या ग्रहांस भल्याभल्या ।
चमक तुझिया नेत्रांची ते विलक्षण पाहती ।
सहजचि फिके होती, मौनें अधोमुख[1] राहती ॥ १८ ॥

प्रतिपदुदिता[2] आकाशींच्या नव्या विधुएवढा[3] ।
विपुल-कबरी-भारीं[4] शोभे सुवासिक केवडा ।
भ्रूकुटिरचना वक्राकारा दुखंड धनूपरी ।
दशन[5] दडले कुंद-श्रेणीपरी[6] अधरांतरीं[7] ॥ १९ ॥

स्मितलहरिनें एक्या वाटे पडे जणु चांदणें ।
अनुपम सुखें हाता येती तुझ्या अवलोकनें ।
वचन वदसी ज्यासीं त्याचें क्षणांत न कां उडे ।
भव-भय महा नाना-जन्मांतरागत बापुडें ? ॥ २० ॥

तव विहरतो श्वास-व्याजें[8] सुगंध मुखांतुनी ।
वसति करितें तेजोरूपें शुचित्व[9] विलोचनीं[10] ।
दिसति कुसुमें वर्णव्याजें तवावयवांबुजीं[11] ।
सकल अथवा मांगल्याचें निधान तनू तुझी ॥ २१ ॥

जनन धरणीगर्भीं, लीला विदेहनृपांघरीं[12] ।
रघुपतिसवें लग्नोत्साह, प्रपंच वनांतरीं ।
दनुजमथनामध्यें[13] झाली समस्त फलश्रुति ।
अकल तुझिया चारित्र्याचें[14] रहस्य जनाप्रती ॥ २२ ॥

प्रकृति म्हणती कोणी माया तुला गुणकोपिनी[15] ।
समजति तथा अव्यक्ताची[16] निजस्थिति-लोपिनी[17] ।

---

१ खालीं मान घालून. २ प्रतिपदेच्या दिवशीं उगवलेल्या. ३ चंद्राएवढा. ४ मोठ्या वेणीच्या बुचड्यांत. ५ दांत. ६ कुंदांच्या फुलांच्या पंक्तीप्रमाणें. ७ ओंठाच्या मागें. ८ निमित्तानें. ९ पावित्र्य. १० डोळ्यांत. ११ तुझ्या अवयवरूपी कमळांत. १२ जनकराजाच्या घरांत. १३ राक्षसांच्या संहारांत. १४ चरित्राचें. १५ त्रिगुणांना उत्पन्न करणारी. १६ ब्रह्माची. १७ आत्म-स्थितीचा घोंटाळा करणारी.

अगुण अकल ब्रह्मासंगें निरंतर खेळसी ।
रमविसि तया रामाख्येला[1] क्षणांतरिं आपसी ॥ २३ ॥

सकलहि दिशा झाले ल्याया तुझ्या तनुला झगे ।
वितत[2] भुवनें निश्वासांचे तुझ्या उठले फुगे ।
तव घरकुलें तीं देवांचीं पुरें गुरु जीं भलीं ।
सुरनर तुझ्या खेळामध्यें विराजति बाहुलीं ॥ २४ ॥

पवन-लहरी सेवेसाठीं तुझ्या चिर वाहती ।
सकल जलधी सीमेमध्यें तवांकित राहती ।
गगनसदनीं तारा-ज्योती निरंतर तेवती ।
रविशशि तुला येतां जातां अबाधित सेवती ॥ २५ ॥

मति बरळते माई! माझी तुझें यश वानितां ।
त्यजुनि सगळी आलों पायापुढें अभिमानिता ।
करसिल कृपा ही तों आशा, स्वभाव-गुणामुळें ।
अधिक रुचतें तें आईला असे बहु जें खुळें ॥ २६ ॥

विविध भजलों देवां, केलीं व्रतें, तप साधिलें ।
नियम धरिले, गेलों तीर्थां, विधी अभिराधिले[3] ।
तदपि न करीं आलीं माझ्या मदीप्सित[4] मंगलें ।
म्हणुनि भजनीं माझें शेखीं[5] तुझ्या मन रंगलें ॥ २७ ॥

सहज जडते श्रद्धा तात्कालिकीं गुणदायकीं[6] ।
मम न बसती झाली नांवाजल्या सुरनायकीं ।
चंपळपण[7] हें माझें किंवा तदीयाचि निश्चयें ।
फलकृपणता[8], हें तों पाहीं विचारुनि तूं स्वयें ॥ २८ ॥

व्यय करुनिया आयुष्याचा बराच पिशापरी ।
मति उपजली त्वत्सेवेची मला इतुक्यावरी ।

---

१ राम नांवाला. २ मोठीं. ३ उपासिले. ४ माझीं इच्छित. ५ शेवटीं. ६ ताबडतोब गुण देणाऱ्या पदार्थांच्या ठिकाणीं. ७ चंचलपणा. ८ फल देण्याविषयीं कंजूषपणा.

शरण तुजला आलों साऱ्या विसर्जुनि देवता ।
धरुं भरंवसा माई! आतां तुझ्याविण कोणता ॥ २९ ॥

समय इतुका गेला, झाला विलंब खरोखरी ।
अनुचित नको मानूं मातें प्रसादफला तरी ।
निपट मुकणें जें मोहानें महत्तम[1] मंगला ।
क्षणभरि बरा त्याच्यापेक्षां विलंबचि जाहला ॥ ३० ॥

परम कपटी मोठा लोभी महाखल पातकी ।
कुमति भलता, साधुद्वेषी, अनावर घातकी ।
तुज अघकथा[2] ही भिन्नत्वें गमेल सुदुःसहा ।
विदित तितुक्या अन्यायांचा असे निधि मी महा ॥ ३१ ॥

कथन करितों पापें मानो खुशाल निलाजरा ;
मज जन, मुळीं त्याचा नाहीं विषाद मला जरा ।
कथुनि भिषजा[3] रुग्णें[4] व्याधी न केवळ भागतें ।
विदित करण्या त्यातें त्याचें निदानहि[5] लागतें ॥ ३२ ॥

जरि छपविलीं मी मत्पापें तशांतहि सर्वथा ;
तरि न दिसती तीं नेत्रांना तुझ्या न अशी कथा ।
करुनि तरि कां घेऊं खोटेपणा मग हानिला ।
अकपटपणा पश्चात्तप्तां[6] महागुण मानिला ॥ ३३ ॥

श्रवण करुनी पापें माझीं मनीं तव भावना ।
उगम कसली घेई याचा मुळीं मज ठाव ना ।
धरिसि करुणा, होई मातें प्रसाद भयाकुला ।
रुसशिल जरी, मी स्तोत्रानें प्रसन्न करीं तुला ॥ ३४ ॥

कठिण जननी झाली चित्तीं जरी निजबालकीं ।
कठिणपण हीं तच्चित्ताचें असे हळुवार कीं ।
म्हणुनि भुवनीं मातृप्रेमा सदा बुध वानिती ।
सदय हृदयीं क्रोधोर्मींचा[7] असंभव[8] मानिती ॥ ३५ ॥

---

१ अत्यंत श्रेष्ठ. २ पापांची कहाणी. ३ वैद्याला. ४ आजाऱ्यानें. ५ कारण.
६ पश्चात्ताप झालेल्यांना. ७ कोपलहरींचा. ८ अशक्यता.

करिसि सदये तूं बालांचें सिध्या अवलोकनें ।
अवन, तुझिया नेत्रांमध्यें कृपामय चांदणें ।
तव मृदुमनीं वात्सल्याचा अलोट वसे झरा ।
स्मितहि नुसतें सोडी तूझें सुधारस-पाझरा ॥ ३६ ॥

सुजन तुझिया वात्सल्याचें सुधा-फल[1] सेविती ।
कुजन सहजीं जातां जातां तयासह जेविती ।
नवल कसलें ! पद्मासंगें निशासमया[2]मधीं ।
विकच[3] करिते धत्तूरांचीं[4] फुलें बहु कौमुदी ॥ ३७ ॥

स्तवन करणें माझें कार्य प्रसाद असे तुझें ।
मज तरि तुझ्या भक्ति-प्रेमाविणें नकळे दुजें ।
चरणिं दिधली डोई आई करीं तनया धरा ।
भयकर भवीं नाहीं यातें तुम्हांविण आसरा ॥ ३८ ॥

शुभ-गुणखनी तूं कल्याणी सुमंगल-दायिनी ।
भुवनपतिची राणी मोक्ष-प्रपा[5] अनपायिनी[6] ।
म्हणुनि जडली श्रद्धा माझी पदीं भवतारकीं ।
तव, पतित जे त्यांच्यासाठीं तुझा अवतार कीं ॥ ३९ ॥

कर मम शिरीं ठेवी माझीं अघें तरि तोकडीं[7] ।
उघडि नुसते डोळे ती तों समाधिच रोकडी ।
चरण मजला दावी मागें न मोक्षहि मी तुला ।
स्मितहि पुरवी किंवा माई ! तुझें मम हेतुला ॥ ४० ॥

विरह-पळ तें कल्पांताच्या परी गमतें मना ।
उपजवि तुझी मौनावस्था भयप्रद भावना ।
हळु हळु उणा आयुष्याचा पडे दिवसावधि ।
करिशिल कृपा आई बाळावरी वद या कधीं ॥ ४१ ॥

---

१ अमृतासारखें फळ. २ रात्रीच्या वेळीं. ३ प्रफुल्ल. ४ धोतऱ्याचीं.
५ मोक्षाची पाणपोई. ६ निरंतर टिकणारी. ७ तुटपुंजीं.

जनक-सदनीं मुग्धा बाला शुचि-स्मित-शालिनी[1]।
रघुपति- गृहीं रम्या रामा महागुण-मालिनी[2]।
चरित सगळें जीचें बोधप्रद प्रमदाजनीं।
सदय जननी माझी माझ्या वसे चिर ती मनीं ॥ ४२ ॥

त्यजुनि विभवें मोठीं वल्कांबरें[3] द्रुत नेसुनी।
वनवसतिला गेलां माई ! तुम्ही श्रम सोसुनी।
सुखद गणिली शीतोष्णांची वनांतिल तीव्रता।
कवण तुमच्या ऐशी आहे जगांत पतिव्रता ॥ ४३ ॥

हरिण तुझिया चारा घेते करांतुनि जाहले।
सदय-नयनालोकामध्यें[4] मयूरक[5] नाहले।
शुक मनगटीं झाले बसूनियां फल भक्षिते।
अहह ! सगळे सद्भाग्याचे खरे पशुपाक्षि ते ॥ ४४ ॥

तव पहुडणें अंकीं, हातें तृणांकुर सेवणें।
तुजसह सुखें येणें जाणें, पदीं शिर ठेवणें।
लवकुश पुढें झाले ज्यांचे अनंतरचे[6] धनी।
बहर पहिला त्या सौख्याचा मृगीं लुटिला वनीं ॥ ४५ ॥

पदरज तुझे ज्या ज्या ठायां वनांतुनि लागले।
उपजुनि तया ठायीं क्षेत्रें शुचित्वचि जागलें।
अवसरवशें[7] ज्या ज्या तोयीं तुझें वपु नाहलें।
क्षितिवरि महातीर्थें ते ते जलाशय जाहले ॥ ४६ ॥

उचित घडलें, ज्यांचा वांटा तयांप्रति लाधला।
क्षणहि मजला त्यांच्यासाठीं न मत्सर बाधला।
समजवि मला कांहीं बाहीं समर्पुनि भातुकें[8]।
दुरित-निधि मी त्या पुण्यात्म्यांसवें कसचा तुके[9] ॥ ४७ ॥

---

१ पवित्र हास्यानें शोभणारी. २ मोठ्या गुणांनीं संपन्न. ३ झाडांच्या सालींचीं वस्त्रें. ४ सकरुण अशा नेत्रकटाक्षांत. ५ मोराचीं पिलें. ६ मागाहूनचे. ७ प्रसंगानुसार. ८ खाऊ. ९ तुलनेस येईन.

श्रवण करिसी माझ्या हांका तरी मग कां अशी ।
धरिशि सदये ! औदासीन्या, अगोचर राहसी ।
जननि ! तुझिया पायांसाठीं तुझा शिशु हा झुरे ।
लवहि करुणा माझ्या कायीं पुरुनि तुझी उरे ॥ ४८ ॥

कसुनि भजकाहातीं घ्यावी अगोदर चाकरी ।
मग उचलुनी द्यावी त्याला यथोचित भाकरी ।
कृपण असला न्याय प्रापंचिकांसाचि साजणें ।
प्रथम करुणा होते तूझी तुला मग पूजणें ॥ ४९ ॥

तुजसि नकळे माझी पीडा असें समजूं कसें ।
अविदित तुझ्या नेत्रा ऐसा जगीं लवही नसे ।
कठिणपण वा आलें चित्तीं तुझ्या समय-क्रमीं ? ।
हृदय अथवा वेधायातें तुझें असमर्थ मी ? ॥ ५० ॥

सुविदित तुझें संसाराशीं पुरातन वांकडें ।
मम मन खुळें घेतें धांव प्रपंचसुखाकडे ।
मुकविल तुझ्या पायां जो कां करीलच दुर्दशा ।
गरज मजला संसाराची मुळींच नसे अशा ॥ ५१ ॥

क्षणभरि तुला ध्यावें, घ्यावें महाफल रोकडें ।
अतिशय तुझें देणें, कल्पद्रुमादिक तोकडे ।
बुडुनि इतुक्यामध्यें गेलों जरी तरि तें हसें ।
ग्रहणजडता-योगें[3] माझें, तुझें नच आळसें ॥ ५२ ॥

मन भरुनियां पश्चात्तापें निरंतर दाटतें ।
विषय विषसे, दारा[4] कारागृहापरि वाटते ।
मजसि गवसे सन्मार्गाचा न निश्चित ठाव तो ।
त्वरित कर दे माई ! नाशा तुझा शिशु पावतो ॥ ५३ ॥

सहज चुकुनी जातां जातां कुठें भलतीकडे ।
पथ सुचविला या संतांनीं तुझा मजला गडे ।

---

१ अदृश्य. २ कालमानानें. ३ घेण्यास असमर्थ असल्यामुळें. ४ बायको.

श्रम विसरलों तूझ्या पाया विलोकुनि मागले।
मधुर असतें जें शेखीं तें समस्तहि चांगलें ॥ ५४ ॥

तुजसि भजतां ही तों भाषा, मला न कळे जरा।
भजनविधि तो, ठावा आहे तुझा तुजला खरा।
वसति करितां लंकेमध्यें अशोकवनांतरीं।
जड तरुशिला यांनाही त्वां दिली जपवैखरी ॥ ५५ ॥

क्षणहि न कधीं आधीं रागेजते तनयावरी।
चुकुनि रुसली त्या कोपाला तरी मृदु माधुरी।
कवच असतें वात्सल्याचें अभेद्य जिच्या मना।
अमित सुकृतें ऐसें माता निधान मिळे जना ॥ ५६ ॥

म्हणवित तुझा आलों कैसा तरी लडिवाळ जी।
तुजविण कुणी घ्यावी माझी तरी वद काळजी।
मजसि परता लोटी आतां करी अथवा दया।
तुजसि सगळी माझी लज्जा करूं श्रम कासया ॥ ५७ ॥

प्रहर पहिला आयुष्याचा अजाणत लोटला।
समजुनि वृथा छंदीं गेला अनंतरचा भला।
असुनि नसल्याऐसा होतो तयापुढला, असें।
कळुनि मजला पश्चात्तापें अतां जडलें पिसें ॥ ५८ ॥

तव म्हणवितों माई! आहे जरी गुरुपातकी।
तुजसि भजतां झालों मोठा जरी हितघातकी।
परम रुसली माता बाळा समर्पिल शासना।
परि निजसुतत्यागीं होई कशी तिज वासना ॥ ५९ ॥

तव शुभ पदीं सर्वस्वाचें समर्पण सर्वथा।
करुनि बसलों आनंदानें करीत तुझ्या कथा।
अधिक चढते नांवा नावा तयांतिल माधुरी।
उबग मजला आला तेणें दुजा विषयांवरी ॥ ६० ॥

---

१ जपाची वाणी. २ पुन्हांपुन्हां. ३ कंटाळा.

हृदय शुचितारूपी तूझें अघाप्रति पारखें ।
म्हणुनि रुसलें किंवा झालें प्रसन्नहि सारखें ।
द्रवपण धरो किंवा पावो हिमत्व यथाक्रमें ।
विमल सलिलें श्रीगंगेच्या तृषा सगळी शमे ॥ ६१ ॥

जननि! पडतो ज्याचे माथ्यावरी तुमचा कर ।
सुरवर भले होती त्यांचे निरंतर चाकर ।
सहज बघतां ज्यातें माई! तुम्ही करुणालवें ।
श्रम न पडतां त्याच्या दारीं महासुख पालेवे ॥ ६२ ॥

क्षण मम नसे विद्वत्तेची मनाप्रति चाड ती ।
लहरि पुरुषा तद्गर्वाच्या व्यर्थंतचि पाडती ।
भजनिं तुझिया रंगे जें तें पिसेपण चांगलें ।
भजकपण दे ऐसें मातें सदा करुणावलें ॥ ६३ ॥

दृढ धरुनियां वैराग्याचा सुनिश्चय, कल्पना ।
शमवुनि बळें, सद्बोधानें निरोधुनियां मना ।
स्थिर जंव करूं पाहे पायीं तुझ्या घटिकाभरी ।
चुकवुनि मला तों तें जातें पुन्हां विषयावरी ॥ ६४ ॥

क्षणहि न तुझ्या भक्ता लागे भवाब्धि तरावया ।
तंवचि मनुजा माया-बाधा तुझी जंव ना दया ।
हित सजसि तूं ज्याचे माई! स्वयेंचि करावया ।
कवण पुसतो त्याच्या ज्ञाना गुणां अथवा वया ॥ ६५ ॥

कळकळ दुजा यावी माझी कुणा तुजवांचुनी ।
प्रणय असतो जातीचा तो नये कधिं सांचुनी ।
विनति जननीपायापाशीं नको बहु यास्तव ।
फुकट उसना तो अन्यांचा करूनि तथा स्तव ॥ ६६ ॥

घडिघडि भयें, नाना चिंता, उपाधि अनेकशा ।
बहुविध मनोदाही दुःखें, परोपरि दुर्दशा ।

---

१ गैरमाहीत. २ फुलतें, पसरतें. ३ मनाला जाळणारीं.

षडरि-छळना[1], जीवाची या क्षणक्षण वंचना[2]।
हर हर ! जळो संसाराची विचित्र विटंबना ॥ ६७ ॥

अनुभव-वशें वाटो लोकीं कसेंहि दुजा कुणा ।
समजुनि मला आलें आतां असेंच पुन्हा पुन्हा ।
हरुनि सगळीं जाण्या लोकीं भयंकर संकटें ।
तुजसि भजणें हें तों आहे महौषध एकटें ॥ ६८ ॥

त्रिभुवन[3]-जयी लंकेशाला मतिभ्रम[4] जाहला ।
म्हणुनि रुधिरीं त्याचा सारा कुलान्वयें[5] नाहला ।
मलिन उरली मागें कीर्ती तदीय जगावरी ।
प्रथम रिपुची[6] बाधा साधारणी न खरोखरी ॥ ६९ ॥

कधिं विसरलों कर्तव्यातें, कधीं चुकलों तथा ।
म्हणुनि मुकलों घ्याया त्याचें भलें फळ सर्वथा ।
काधिं भडकलों केव्हां झालों प्रमादपटु[7] स्वयें ।
बुडविल मला वाटे आतां भवार्णव[8] निश्चयें ॥ ७० ॥

सगुण विभुची[9] तूं अर्धांगी[10] प्रसिद्ध पतिव्रता ।
सगुण[11]-जननी मायारूपें तशी पण तत्वता ।
उभयविध या नात्यांमध्यें खरें तव कोणतें ।
उकलतिल हें कोडें जे ते पुरे जन जाणते ॥ ७१ ॥

भजक शकती त्वन्मूर्तीतें न पूर्ण पहावया ।
खल न धजती दुर्भागित्वें[12] महा विधिला तया ।
लपुनि बसली साऱ्या विश्वीं असूनहि संचिली ।
भुवननयना स्वीया मूर्ती तुवां अशि वंचिली[13] ॥ ७२ ॥
श्रम बहु नको घ्याया माई! तुम्ही मम तारणीं ।
स्मितहि तुमचें साधें माझ्या पुरे हितकारणीं ।

---

१ कामक्रोधादि षड्रिपूंनीं केलेला छळ. २ फसवणूक. ३ त्रिभुवनाला जिंकणाऱ्या. ४ बुद्धिभ्रंश. ५ वंश. ६ पहिल्या शत्रूची (मदनाची). ७ चुका करणारा. ८ संसारसमुद्र. ९ प्रभूची (रामाची). १० बायको. ११ सगुणाला उत्पन्न करणारी. १२ फुटक्या नशिबामुळें. १३ चोरली.

कुमुद फुलतें पृथ्वीपाठीं, नभीं दुरि चंद्रिका ।
स्मरण-महिमा अन्योन्यांचा असे स्फुट हा निका[१] ॥ ७३ ॥

षडरि टपले, बाधा सिद्धा, पुढें यमजांचणी ।
क्षणिक तनुला देती व्याधी निरंतर काचणी ।
पिशुन[२] जन जे त्यांच्या नादें पुरा पडलों फशीं ।
उपजत तुला नाहीं माझी अजूनि दया कशी ॥ ७४ ॥

स्तवित तुजला आलों माई! जसें सुचलें तसें ।
शपथ करितों त्वत्पादांची तुझेंचि मला पिसें ।
अजुनि कठिनें चित्तें मातें न दाविशि पाय जी ।
लवकुश तुझीं बाळें, आम्ही अमातृक[३] काय जी ! ॥ ७५ ॥

दिवस दिवसापाठीं येतो, निशाहि निशेवरी ।
खळ न पडतां चाले स्पर्धा तयांतुनि यापरी ।
हळुहळु सरे माझें आयु. क्रमें परि त्यामुळें ।
अनय उघडा आई! वारी जगांतिल हा बळें ॥ ७६ ॥

वश न नियमां होतें, जातें पुन्हां विषयावरी ।
क्षणहि न ठरे अभ्यासाला, उडूनि पळे दुरी ।
हित न परिसे, ज्याचें सारें चरित्रचि वांवगें[४] ।
मन मम असें झालें माते अनावर धांव गे ॥ ७७ ॥

परमकरुणा तूं सर्वेशा तरी तुज 'धांव' मी ।
'जननि बुडतों' ऐशा हाका खुळा शतधा वमीं[५] ।
अनय[६] न गणी तूं हा माझा, कष्टस्थिति[७]-दर्शनीं ।
सहज शिशुच्या 'आई' ऐसा मुखें निघतो ध्वनी ॥ ७८ ॥

पतिस भजती त्याचे नावाजती गुण तत्वता ।
असतिल अशा झाल्या लोकीं अनेक पतिव्रता ।
अगुण पतिला स्वप्रेमानें पुरा करणें गुणी ।
अतुल करणी ऐशी केली तुझ्याविण गे कुणी ॥ ७९ ॥

---

१ चांगला. २ दुष्ट. ३ आई नसलेला. ४ गैरशिस्त. ५ (हांका) मारतों. ६ अपराध. ७ वाईट स्थिति दिसून आली असतां.

क्षणभरि सुखी होतों, दुःखी तथा दुसऱ्या क्षणीं ।
स्थिरपण नसे कांहीं माझ्या मनःस्थिति-लक्षणीं ।
चिखलपण तें वेगें येतें धुळीस जलामुळें ।
प्रखर रविच्या तापें होती दुजाक्षणिं ढेकळें ॥ ८० ॥

स्मरण हृदयीं आनंदानें करीन तुझें सदा ।
जपत तुझिया नामा प्रेमें बसेन अनेकदां ।
भजन करणें हें कल्याण, प्रसाद असो नसो ।
उचित करितों माझें चित्तीं कसेंहि तुझ्या वसो ॥ ८१ ॥

बहु जन पिसे मुक्तीसाठीं, मला तरि अल्प ना ।
अजुनि बरवी आली तीची परि[1]स्फुट कल्पना ।
नयनविषया तेथें मूर्ती नसेल तुझी तरी ।
मजसि असल्या मोक्षश्रीची न चाड खरोखरी ॥ ८२ ॥

तव गुणगणीं एखाद्याच्या बळें जग चाललें ।
इतर उरले स्तोत्रासाठीं कितीक भलेभले ।
धवलावि जगा तेजें ऐसा असे रवि एकटा ।
ग्रहगण नभीं शोभेसाठीं असे परि धाकटा ॥ ८३ ॥

दिवस इतुके होतों आशा धरून तुझी मनीं ।
क्रमिन पुढले आनंदानें तुझ्या गुणचिंतनीं ।
मिळतिल कधींकाळीं तेव्हां मिळोत शुभें फळें ।
मति उपजणें ऐसी हें तों भल्यांत महाभलें ॥ ८४ ॥

जरि भरंवसा संसाराचा तुला नुरला खरा ।
शिण उपजला व्यामोहां[2]चा तुला फुलपांखरा ।
विमल-चरिता धीरोदा[3]त्ता अमो[4]घ पतिव्रता ।
सुगुण-कालिका सीता आतां मना ! भज तत्त्वता ॥ ८५ ॥

गुणगण जिचे गाते गानीं पुराण कथावली ।
सद[5]मलयशोगंगा श्रांता जनाप्रति मावली ।

---

१ उघड, चांगली. २ अज्ञानाचा. ३ धीर आणि उदार. ४ दृढ. ५ चांगल्या आणि निर्मळ यशाची गंगा.

त्रिभुवनतळीं त्वन्नामाचा पवित्रपणा भरे ।
विजय करिजे त्या मी कैसा तुझा वद पामरें ॥ ८६ ॥

वदन जिकडे हांसे माई ! तुझें तिकडे शुभें ।
सकल तिकडे मांगल्यांचें कदंब खडें उभें ।
चरण जिकडे होती माते तुझे तिकडे यशें ।
वळति सगळीं आपोआप प्रसाद-कला-वशें ॥ ८७ ॥

शरण इतुक्यासाठीं आलों वियोग मला नसो ।
तुजसि इतुक्यासाठीं ध्यातों न मोह मनीं वसो ।
तुजमजमधें ही तों भाषा प्रवृत्ति-वशें उठे ।
जननि-शिशुच्या प्रेमामध्यें विकल्प वसे कुठें ॥ ८८ ॥

पदयुग तुझें राहो माझ्या मनीं अथ लोचनीं ।
मम मति जडो त्याच्याठायीं सदा भव-मोचनीं ।
इतर भलता कांहीं याच्याविना वर मागतां ।
झडुनि रसना जावो माझी क्षणार्ध न लागतां ॥ ८९ ॥

बघसि करुणापूर्ण नेत्रें तरी मग मी कृती ।
निरखिसि जरी कोपानें मी अधन्य तरी अति ।
विपुल-सरिताधारें जो कां धरी निज जीवना ।
झर चिमुकला मी त्याऐसा तुझा जन पोसणा ॥ ९० ॥

गुज हृदयिंचें माझ्या आहे तुला कळलें पुरें ।
विदित करणें ऐसें कांहीं तयावरती नुरे ।
स्थिति बघुनियां माझी आतां निराश्रित तत्वता ।
मज उचित जें तें तूं देई मला न विचारतां ॥ ९१ ॥

कवन कविचें, कीं मूढाचे प्रलाप बुरे भले, ।
स्तवन-लव वा, मद्दुःखांची कथा, तुजला कळे ।
सकळहि मुखें आलें जें जें मनीं न शके सलूं ।
म्हण मज सुखें आतां कांहीं, नको परि मोकलूं ॥ ९२ ॥

---

१ समुदाय. २ उपकार करण्याच्या उपजत गुणामुळें. ३ व्यावहारिक नात्यानें. ४ संसारांतून सोडविणाऱ्या. ५ जीभ. ६ धन्य.

जतन करण्याजोगी माझी किती चतुरा मती ।
बघुनि मजला देई दाना यथोचित संप्रति ।
तृषित मुलगा प्यायासाठीं करीं घट मागतो ।
म्हणुनि सगळा तो कां त्याच्या तृषेस्तव लागतो ॥ ९३ ॥

चरण हृदयीं, हातीं टाळीं, मुखीं बिरुदावली[1] ! ।
धरुनि तुझिया नामा कंठीं त्यजूनि तृषा फलीं ।
जयति जननी सीतादेवी रघूत्तम-चित्कला[2] ! ।
करित वदनें ऐशा घोषा भजेन सदा तुला ॥ ९४ ॥

सुकृत घडतें आधीं, होतें फलोन्मुख तें पुढें ।
गुरुपदयुगासंगें भेटी तयास्तव आतुडे[3] ।
मग गुरुमुखें होतो ज्ञान-प्रसाद, तयामुळें ।
जननि! नयनामध्यें मूर्ती तुझी स्फुरते वळें ॥ ९५ ॥

विगलित-फलें[4] सारीं कर्मे, अदांभिक वर्तनें ।
प्रियकर कथा, अद्वैताचीं मनोमय[5] नर्तनें ।
प्रणय-मधुरा[6] नीती, भाषा जनांत अकर्कशा[7] ।
बनवि जगता तूं स्वर्गीय प्रसादबळें अशा ॥ ९६ ॥

विमल करणें, साधें लेणें, अकृत्रिम बोलणें ।
सरळ हसणें, देणें घेणें सुखास्तव डोलणें ।
विसरुनि अहंभावा लोकीं क्षितीवरि नांदणें ।
जननि ! पसरी आनंदाचें असें नव चांदणें ॥ ९७ ॥

श्रवण करितां माझे नाना प्रलाप पिशापरी ।
शिण उपजला माई! तूतें असेल खरोखरी ।
त्यजुनि वदलों वाचालत्वें बहू विनय क्रमा ।
जननि सगळ्या अन्यायांची करीं मजला क्षमा ॥ ९८ ॥

स्तविन तुजला पांडित्याच्या बळें मज वाटलें ।
मदबळ परी तें चित्तींचें समस्तहि आटलें ।

---

१ अनेक प्रकारचे बाणे. २ रामाची ज्ञानशक्ति. ३ होते. ४ ज्यांतील फळें गळून गेलीं आहेत अशीं. ५ मानसिक. ६ प्रेमामुळें गोड. ७ मिष्ट, गोड.

स्तिमित रसना झाली आतां धरूनि मुकेपणा ।
उगिच बसणें या वेदांच्या मला पटल्या खुणा ॥ ९९ ॥

मजसम अपराधी अन्य नाहींच कोणी ।
तुजसम करुणेची नाढळे अन्य खाणी ।
धरुनि भरंवसा मी सर्वथा त्वत्पदाचा ।
शरण तुजसि आलों दाखवीं ठाव साचा ॥ १०० ॥

चित्तींच्या आंतिं शब्दें स्फुटतर करण्या बुद्धि जी देइ आधीं ।
जी घेते शांत चित्तें परिसुनि मग तीं भाषणें मुग्ध साधीं ।
बाधा ऐकूनि जीचें हृदय तळमळे तूर्ण त्यांच्या निरासा[3] ।
जातीची प्रेमसिंधू[4] त्यजिल मग कशी माय ती साधुदासा ॥१०१॥

मराठी ग्रंथ संग्रहालय
नं. ........
ता. ........
ठाणे.

---

१ स्तब्ध. २ दुःखें. ३ दूर करण्यास. ४ प्रेमाची नदी.

# स्फुट कविता.

[ पुणें मुक्कामीं रेंदाळकर कवि यांनीं एकाएकीं कविता करून मागितली असतां करून दिलेली कविता. ]

## कविनें कविता मागितली.

### तोटक वृत्त.

कविनें कविता मज मागितली ।
करण्या बसल्या समयीं कथिली ।
कविता मज पाहुनियां रुसली ।
तरि आज करूं कविता कसली ॥ १ ॥

कविता स्वर काय विण्यामधले ।
म्हणुनी तुज छेडुनि दावुं भले ? ।
कविता गुज बोल मनापुरता ।
प्रिय तूं बन, मी करितों कविता ॥ २ ॥

कविता मधुराकृति कां रमणी ।
म्हणुनी तिज पाडुं तुझ्या नयनीं ? ।
कविता करपाश जिवाभंवता ।
मृदु तूं बन, मी करितों कविता ॥ ३ ॥

कविता वद काय वसंत-रमा[1] ।
म्हणुनी तुज दावुं तिची सुषमा[2] ? ।
कविता द्युतिलेख[3] मतीपुरता ।
पटु तूं बन, निर्मिन मी कविता ॥ ४ ॥

कविता वद काय करंजिपुरी ।
म्हणुनी करुनी तव देउं करीं ? ।

---

१ वसंतऋतूची लक्ष्मी. २ शोभा. ३ प्रकाशलेख ( फोटोग्राफ ).

कविता मकरंद फुलापुरता ।
अलि तूं बन, मी करितों कविता ॥ ५॥

कविता सखया न गुलाबकळी ।
तुज कीं मृदु गंध तिचा कवळी ।
कविता कवि-चंदन-धूप-वली[1] ।
बन मारुत तूं कविता उकली ॥ ६ ॥

९५६५ दा. क.

---

( जगास तुच्छ लेखणाऱ्या एका कवीस उद्देशून. )

## गर्वध्वनि.

( गवयाच्या गाण्यास जशी तबलजीची साथ पाहिजे तशी जगाच्या गाण्याला कवीची साथ पाहिजे. जगाच्या सुराशीं कवीचा सूर मिळाला पाहिजे, जगाच्या तालाशीं कवीचा ताल मिळाला पाहिजे तरच ती साथ होईल. कवि जरी कुठेंही संचार करीत असला तरी त्यानें समतेच्या समेवर जगास मिळालें पाहिजे.)

( प्रमिताक्षरा वृत्त )

सखया मृदंग मृदु वाजविशी ।
रुचला त्वदीय बहु बाज मशीं ।
परि वादनांत उठतां बसतां ।
म्हणसी कुणास धिक तान् धिक तान्? ॥ १ ॥

तव बोल बोलति सुरेख किती ।
भरण्यासही तव असे न मिती ।
वरिशी किमर्थ मग बेसुरता ।
म्हणुनी दुजांस धिक तान् धिक तान्? ॥ २ ॥

लयकार लोक म्हणतात तुला ।
अससी विभूषणचि आत्मकुला ।

---

१ कविरूपी चंदनाच्या सुगंधाची पुरचुंडी.

दिसते तथापि तव वेलयता ।
म्हणतां जनांस धिक तान् धिक तान् ॥ ३ ॥

जग गाइ गायन, तयांत शिरूं ।
चल त्यास आपणहि साथ करूं ।
बघ आपली दिसत उद्धटता ।
वदतां जगास धिक तान् धिक तान् ॥ ४ ॥

बनुंया समस्वर जगासह रे ।
समताल त्यासहित होउं बरें ।
वद ठाव कोठुनि जगापरता? ।
न म्हणूं म्हणून धिक तान् धिक तान् ॥ ५ ॥

मनसोक्त आपण जरी फिरलों ।
कवणीकडेहि जरि वावरलों ।
समतासमेवरि मिळूं जगता ।
न वदूं कुणास धिक तान् धिक तान् ॥ ६ ॥

---

[ १९१५ च्या आक्टोबर महिन्यांत मुंबईस नवीन निघालेल्या 'वनिताविश्राम' नांवाच्या मासिकाच्या अंकांत दिलेली कविता. ]

# वनितादर्श.

बाळ गुणांची मम खाशी । उगा बये ! कां रडतेसी ।
काय जाहलें सांग तुशीं । डोळे सुकवुनि कां घेशी ।
स्वभार उतरित ।
दुजांस वितरित ।
जगांत पसरित ।
रडें रडावें ममतेचें । जसें आर्द्र घनमालेचें ॥ १ ॥

ताई ! खदखद हससि किती । ही हंसण्याची कां रीती ।
तूं तरि नारीची जाती । मर्यादेची गे मूर्ती ।

स्वतास खुलवित ।
दुजांस डुलवित ।
जगास भुलवित ।
हंसें हसावें गमतीचें । जसें गुलाबी उषेचें ॥ २ ॥

दागदागिन्यांची जोड । केवळ नेत्रांची ओढ ।
बाई ! ही न बरी खोड । तरुण वयांतचि ती सोड ।
स्वतास लपवित ।
दुजांस दिपवित ।
जनांस सुखवित ।
लेणें ल्यावें नवतीचें । जसें लाजऱ्या लतिकेचें ॥ ३ ॥

माई ! प्राढ तुम्ही झालां । काळाचा येइल घाला ।
आलां कुठुनि कुठें गेलां । विदित न राहिल कोणाला ।
स्वतास गमवित ।
पतीस रमवित ।
जगास नमवित ।
जिणें जगावें किमतीचें । जैसें पावन सरितेचें ॥ ४ ॥

---

## व्यसनी.

( दोधक वृत्त. )

व्योमगृहांतिल निर्मल तारा ।
चंद्र निघे कवळीत भरारा ।
भ्रष्ट तयांस करीतचि नाहीं ।
जारपणांत तशाच नवाई ॥ १ ॥

गंध लता-कुसुमीं लपलेला ।
चोरुनि मारुत सांडित गेला ।
निर्धन त्यांस करीतचि नाहीं ।
चौर्यगुणांत तशाच भलाई ॥ २ ॥

मराठी ग्रंथ संग्रहालय
नं.
ता.

एक फुलावरुनी दुसऱ्याचा ।
भृंग निघे मधु चाखित साचा ।
त्यास निशा परि येतचि नाहीं ।
कैफगुणांत तशाच बढाई ॥ ३ ॥

ह्यावरुनी क्षणिं त्या विषयाला ।
शून्य मनें कवि गुंगत गेला ।
त्या विषयीं कुणि मानित नाहीं ।
कीं व्यसनांत अशा चतुराई ॥ ४ ॥

---

## प्रेमयोगी.

जो नाचे लतिकांसंगें ।
जो तारांमध्यें रंगे ।
जो शून्यामध्यें गुंगे ।
जो कृत्रिमतेला विसरुनि जाणें दीक्षा ही पढला ।
तो प्रेमयोगी झाला ॥ १ ॥

जो भलत्या जागीं जाई ।
जो भलती सृष्टी पाही ।
जो भलत्या छंदीं राही ।
जो परमाणूमाधें विश्व पाहणें मुद्रा ही नटला ।
तो प्रेमयोगी झाला ॥ २ ॥

जो सरितांसंगें खेळे ।
जो लहरींवरती लोळे ।
जो विहगांसंगें बोले ।
जो प्रेम पेरुनी प्रेम पिकाविणें दंड हा त्याला ।
तो प्रेमयोगी झाला ॥ ३ ॥

जो शून्याचा संगीती ।
जो नादाचा अद्वैती ।

जो प्रेमाचा सिद्धांती ।
जो निर्वैराचें कवच चढविणें कंथा ही सजला ।
तो प्रेमयोगी झाला ॥ ४ ॥

---

# भ्रातृवियोग.

अमित जीवनें थबथबलेला ।
आकाशीं जो होता लवला ।
तो घन निर्दय वातें लुटला ।
एकाएकीं हरुनी नेला, कोणिकडे, ठावें कोणा ?
ध्वनी लोपता, दाह, शून्यता, उरल्या त्याच्या शेष खुणा १

" आत्मा आहे अमर सर्वथा " ।
कंठरवें हें तुम्ही सांगतां ।
परंतु एकच गोष्ट विसरतां ।
त्याच्या गमनीं सुकतिल सरिता, लता करपतिल ज्या आतां।
जगवितील कां त्यांना तुमच्या अमरत्वाच्या या बाता ?॥ २॥

एक हडामासांचा रांधा ।
त्याचा पूर्ण निखळला सांधा ।
तसाच होता लागाबांधा ।
करा सुखें कसल्याही बोधा, दुःखाश्रूंच्या या धारा ।
वाळतिल तदा वाळोत ! दुरी गेला निघुनी पुसणारा ॥३॥

जीवशिवांच्या होतिल भेटी ।
सारे मिळतिल पुन्हा शेवटीं ।
सर्व खऱ्या या तुमच्या गोष्टी ।
परी विकट या ताटातूटी , दृष्टिसुखाचा ओलावा ।
स्मरणाच्या त्या माळावरती आतां कुठुनी भोगावा ?॥ ४ ॥

---

मराठी ... नं. ... ता. ... तारीख

# एकच शब्द.

(इंदुवदना वृत्त.)

एक सखि! शब्द मृदु गोड आणिं बोल।
तोचि गमतोचि मज आज बहुमोल।
एक तव शब्द मज आणविल डोल।
नातरि घडेल मम जीवितचि फोल ॥ १ ॥

एक किरणांत दिनमान समजे तें।
एक झुळुकेंत पवमानबल येतें।
एक चमकेंत दिपवोनि विज लोपे।
एकचि कटाक्ष करि दिव्य सुख सोपें ॥ २ ॥

एक विधु सर्व गगनास सजवीतो।
एक अरुणोदय दिशांस हसवीतो।
एक सुमजन्म करि बाग रमणीय।
एक मृदु हास करि आयु कमनीय ॥ ३ ॥

एक तव शब्द मम भूत-भवितव्यां।
सांधुनि करील मम सौख्यतति भव्या।
एक तव बोल मम भाग्यदरवाजा।
दावि उघडूनि मज सौख्यनिधि माझा ॥ ४ ॥

---

# आईच्या शंका.

( प्रहर्षिणी वृत्त. )

आलासी फिरुनि कुणीकडोनि बाळा।
हा कैसा तुजसि सदैव एक चाळा।
नाहीं कां तुज भय वाटलें कुणाचें।
वेडें गे कितितरि बाळ हें गुणांचें ॥ १ ॥

हीं गालांवरिल तुझ्या छटा गुलाबी ।
चुंबोनी रवि पळवील आत्मबिंबीं ।
जाग्याची हरुनि छबीच न्यावयांची ।
ही रीती नवल कुठील चुंबनाची? ॥ २ ॥
या काळ्या सडक अशा तुझ्या कचांला ।
वायूच्या विसकटतील ऊर्मिमाला ।
हातांनीं कुरळ हळूच सांवरावे ।
हें त्यांना कसब नसे मुळींच ठावें ॥ ३ ॥
या तूझ्या अति सुकुमार पावलांची ।
कांट्यांनीं धरणि दशा करील साची ।
वेल्हाळा हळुच धरून खेळवावें ।
हें आईविण दुसऱ्या कसें कळावें ॥ ४ ॥
तूं राही बसुनि असा सदा मंदकीं ।
आईला कवण म्हणोत दीर्घशंकी ।
अस्पर्शी सहृदयतेसि वृत्ति ज्यांच्या ।
लावावा कर वदना कुणी अशांच्या ? ॥ ५ ॥

---

(श्री. बापुसाहेब महाराज चाफळकर यांची स्वारी आम्ही राहत होतों तेथें आली असतां निघालेले उद्गार.)

## वियोगिनी वृत्त.

गमतें बहुवार आमचीं कृत पुण्यें फळलींच मागलीं ।
म्हणुनी सदनास आमुच्या तुमची पावन धूळ लागली ॥ १॥
भवदीय कृपा फळो पुढें, शुभ पुण्यें चरणींच नांदणें ।
स्रवतो न सुधेसि जों शशी पडतें तोंवरि रम्य चांदणें ॥ २॥
शुभ दर्शन सुप्रसाद हा, सगळी त्यांतच एक थोरवी ।
फुलतात अपाप पंकजें उदया केवळ येइ तो रवि ॥ ३ ॥
तुमचें रघुनाथ कर्म हें, तुमच्या भक्तिस तोच आसरा ।
रघुनाथाचि बोध्य एकटा तुमची पूर्व अशी परंपरा ॥ ४ ॥

---

१ लहरी. २ माझ्या मांडीवर. ३ स्पर्श न करणाऱ्या, पारख्या.

मिळवोनि ' समर्थ ' पूर्वजीं तुमच्या जें श्रुत नाम ठेविलें ।
चिर भूषविलें तया तुम्ही चरितानें, जननें न केवळें ॥ ५ ॥
कर आपण ठेवणें शिरीं, चिर आम्ही चरणास लागणें ।
पुढतीहि अशी असो कृपा दुसरें याविण काय मागणें ॥ ६ ॥
वरदान करा, करीं धरा भवसिंधूंतुनि दास उद्धरा ।
कलिदोष हरा, नसे खरा, भज साधूंविण अन्य आसरा ॥७॥
नमनाविण काय पामरें प्रभु गंगाधरजींस देइजें ।
वदला लडिवाळ बाळ जें वच तें गोड करूनि घेइजे ॥ ८ ॥

---

जमखंडी येथें श्रीरामचंद्रराव अप्पासाहेब कुबांत मी उभा असतां तेथील कारभारी राव० सप्रे यांनीं 'हे कोण' अशी शेजारच्या गृहस्थांपाशीं पृच्छा केली तेव्हां मींच त्यांना पुढील उत्तर करून दिलें.

## मी कोण ?

मी कोण ? जिव्हाळा कोमळ मी कवितेचा ।
चालता बोलता श्वासचि रसिकत्वाचा ।
मी वीणावादक मृदुल वृत्ति-तारांचा ।
मी मेघ वर्षता सुरस-सुधा-धारांचा ।
आश्रमीं पंच तत्वांच्या राहतों ।
ईश्वरी गूढ लीलांना पाहतों ।
तत्पदीं सर्व संकल्पां वाहतों ।
मी अभेद रूपें जगता उरलों साचा ।
आपणांसारख्या दास साधुसुजनांचा ॥ १ ॥

---

## कविवर्य.

( शार्दूलविक्रीडित वृत्त. )

नाहीं मी कविवर्य, या जड जना ही कासया थोरवी ।
मानाच्या वचनास मान असतो सीमेंत तें जोंवरी ।

स्नेहाची तव अर्थशून्य पदवी ही खैर मोठी करी ।
मी देतों परि लक्ष्य केवळ तिच्या प्रेमीं न वा गौरवीं ॥ १ ॥

यंत्रें सूक्ष्मनिदर्शकें जन वघे मित्रादिकांच्या गुणा ।
अन्यांचे गुण पाहतां परि बने तद्दृष्टि आकुंचितां ।
हा तों केवळ दृष्टिभेद, समता लावूनियां पाहतां ।
एखादा द्विजराज थोर, इतरां तुल्यत्व तारागणा ! ॥ २ ॥

कांहीं रूपगुणें जगास रुचती कांहीं स्वविद्यागुणें ।
कोणी गानगुणें, दुजा सुकवनें विश्वास मोहीतसे ।
आहे एक विशेष त्यांप्रति, परी प्रीतीस हेतू नसे ।
साध्वीं अर्थविहीन मुग्ध वचनें बालास हीं भूषणें ॥ ३ ॥

कोणी कंठमणी मनोहर कवि श्रीशारदांगावरी ।
कोणी हार तिचे, कुणी सुवसनें, कोणी शिरोभूषणें ।
त्यांना कौतुक हें यथार्थ गमतें, बाजूस शोभेविणें ।
आनंदें असतों तिच्या चिमुकल्या मी गालबोटापरी ॥ ४ ॥

---

# कवींचा निरोप.

( सुमंत कवींनीं पद्यांत पुढील निरोप मागितला. )

निरोप मजला दे मित्रा ! दे निज गांवा जाया ।
समान हृदयें मिळून गेलीं भिन्न जरी काया ॥ १ ॥

तनूतनूंचा परिचय नव्हता, होता हृदयांचा ।
दृष्टिस दृष्टी भिडतां आला अनुभव कीं याचा ॥ २ ॥

देहमीलनीं वियोग, नाहीं हृदय-मीलनांत ।
काय म्हणुनि मग ताप गमावा माझ्या गमनांत ॥ ३ ॥

---

१ मनुष्य आपल्या मित्रांचे गुण सूक्ष्मदर्शक यंत्रांतून पाहिल्याप्रमाणें पाहतो, अर्थात् त्याला ते बारीक असले तरी मोठे दिसतात. २ लोकांचे गुण पाहतांना मनुष्याची दृष्टि आकुंचित ( शॉर्ट साइट ) होते अर्थात् ते मोठे असले तरी त्याला दिसत नाहींत.

९५६५


दढता आली अमुच्या स्नेहा फुलली प्रीतिलता ।
फळें सुखाचीं सेवूं पुढतीं करुनी एकमता ॥ ४ ॥
कुमुदचंद्र हे दूर राहुनी जैसे खुलतात ।
तसे आम्हिही खुलुनी जाऊं चिर प्रमोदांत ॥ ५ ॥
फिरवी दृष्टी फिरवी मागें मीहि वळुनि जातों ।
दिधला प्रेमोपहार मज तो ' वनविहार ' गातों ॥ ६ ॥
पुरे पुरे ही निरोपवाणी कधिं न सरायाची ।
शब्दमालिका गुंफायाची रीती प्रणयाची ॥ ७ ॥

—सुमंत.

---

# कवींचा निरोप.

( सुमंत कवींना दिलेला निरोप. )

आला आधीं अपरिचितापरि त्यासि ठाव दिधला ।
अपरिचिताचा परिचित होउनि बद्धमूल झाला ॥ १ ॥
पसरुनियां स्नेहाचें जाळें एकचित्त झाला ।
अल्पावसरें मागायातें निरोप मग सजला ॥ २ ॥
अर्धदिसाचा सर्व खेळ हा दर्शन परिचियलें ।
परिचय झाला स्निग्ध मनाशीं हृदय एकवटलें ॥ ३ ॥
मनें मिळालीं देह दूर हे सरुत सावकाश ।
द्यावा[1] आतां निरोप कैसा कोणी कोणास ? ॥ ४ ॥
सिंधूच्या घरिं सिंधु पाहुणा होय सिंधुराशि ।
दीपाच्या घरिं दीप पाहुणा वाढवि तेजासि ॥ ५ ॥
पुष्पाच्या घरिं पुष्प पाहुणें गंधाच्या राशि ।
सहृदयतेच्या करितें सहृदय लोभवर्धनासी ॥ ६ ॥
मनामनांचा मेळ जाहला नभाहुनी थोर ।
निरोप घेउनि आतां मित्रा कोठें जाणार ? ॥ ७ ॥

—साधुदास.

---

१ भेटीचा परिणाम परिचयांत झाला.

REFBK-0001565
REFBK-0001565